अहमदनगरचे नाव आता 'अनाथनगर' किंवा 'अराजकनगर' करा

स्वादमय सकाळचा नाश्ता
मिसळपाव, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडासांबर,मसालाडोसा, उपमा, उत्तपा, शीरा पुरी भाजी,
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी. रोड,अहमदनगर.फोन :०२४१ २३४७६०, ९८५७९९८५७०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ०५.०७.२०२४ | अंक नं. १०७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉन्टॅक्ट लेन्स ◦ मोतिबिंदू ◦ काचबिंदू ◦ नेत्रदोषपण
डॉ. कांकरिया
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १ नोंदणीची आवश्यक
साई सूर्य नेत्रसेवा
सुन्दर सारुरी करा
९ रहिमन आय हॉस्पिटल, पुणे ▪ साई ड्रग्ज लिमिटेड, मुंबई
▶ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नेत्रसाधनांचे दान
▶ लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा तात्कालिक विक्रम
▶ आंतरराष्ट्रीय बौद्धिक भारताशिवाय ४० वर्षे जगभरातील सेवा
कांकरिया, सागरिका, चौक, अ.नगर ५१५००१
Email : saisuryaaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

पालकमंत्री असून नसून सारखेच, आयुक्त फरार, महापालिका उजाड..

कायदा, सुव्यवस्था व प्रशासन सुस्त.. आणीबाणी ग्रस्त केंद्रशासित प्रदेश जाहीर करावा; मुख्यमंत्र्यांना निवेदन

नगर – आजवर अहमदनगर महानगरपालिकेच्या अराजक कारभारबद्दल अनेकदा वस्तुस्थितीसह निवेदने करूनही शासनाकडून कुठलीही ठोस कार्यवाही होत नाही. हे काम आपल्याकडून शक्य नसल्यास अहमदनगर शहराला 'अराजकनगर' म्हणून केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर करावे. संपूर्ण देशामध्ये अहमदनगर शहराइतकी विरोधाभासी परिस्थिती आणि अराजकता कुठेही नसेल, हादेखील एक ऐतिहासिक विक्रम आहे. मागील काही दिवसांपासून शासनाकडून देखील इतर सर्व महत्त्वाची कामे दुर्लक्षित करून शहरांची नावे बदलण्याचे अतिमहत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतले असतील तर अहमदनगरचे तेवढे नाव आता पुन्हा बदलून 'अराजकनगर' करावे, अशी परिस्थिती आहे, असे जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात मुख्यमंत्र्यांना उद्देशून म्हटले आहे की, आपणाकडे हस्ते परहस्ते 'ऑल इज वेल' असा गोपनीय अहवाल नगर शहराचा पाठवला जातो की काय? अशी शंका येते. देशात 'विकास' नावाचा प्रकल्प फक्त अहमदनगर सोडून उरलेल्या सगळ्या देशात चालू आहे की काय? असे अहमदनगरवासियांना वाटते. येथील वास्तव परिस्थिती वर्णन करणारे निवेदन यापूर्वी आपल्याला दिले असता त्यावर काहीही कारवाई झालेली नाही. कुठल्याही शहराचा दर्जा त्या गोष्टींवर ठरतो, त्या म्हणजे त्या शहरातील अंतर्गत दळणवळण प्रणाली, रस्ते लाईट, पाणी, मूलभूत सुविधा, स्वच्छता, रोजगार, कायदा आणि सुव्यवस्था! आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वच्या सर्व बाबतीत अत्यंत अराजकता सध्या नगर शहरात चालू आहे. यावियोगी आता थेट मुख्यमंत्री म्हणून तातडीचे काही निर्णय न घेतल्यास अहमदनगर हे 'अनाथनगर' होईल हे सांगण्यासाठी कुठल्या ज्योतिषाची गरज नाही.

आयुक्तांसारखा महत्त्वाचा व्यक्ती भ्रष्टाचाराच्या जंगलात फरार

मनुष्यबळाअभावी तसेच शिस्तप्रिय व पात्रता असलेल्या अधिकाऱ्यांच्या अभावी महानगरपालिका अक्षरशः शेवटचा श्वास मोजत आहे. त्यामध्ये भर म्हणून की काय आयुक्तासारखा महत्त्वाचा व्यक्ती स्वतःच भ्रष्टाचाराच्या जंगलात फरार आहे. कोरोना काळामध्ये जसे जिल्हाधिकारी राहुल द्वेदी यांच्याकडे पदभार सोपवला होता, तसा जिल्हाधिकाऱ्यांकडे विशेष करून पदभार सोपवणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर इतकी आणीबाणीची परिस्थिती आहे की खरे म्हणजे उपजिल्हाधिकारी दर्जाचा मिलिटरी दर्जाचा धडाडीचा अधिकारी पूर्णवेळ प्रशासक म्हणून नेमायला हवा. इतक्या तक्रारी आपल्याकडे प्राप्त झालेल्या आहेत, परंतु आपल्याकडून काहीही कार्यवाही होत नाही. सगळ्या विभागांमधे फक्त 'प्रभारी राज' चालू आहे. एका एका व्यक्तीकडे चार चार प्रभारी पदे बळजबरीने दिलेली आहेत. तो एकाही पदाला न्याय देऊ शकत नाही. मनपामधील जवळजवळ सर्वच कर्मचाऱ्यांना ब्लड प्रेशर, डायबिटीस यासारखे भयानक आजार, तणावामुळे जडलेले आहेत.

नगररचनाचा झाला 'भ्रष्ट रचना विभाग'

महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा, राजकारणातला सक्रिय जिल्हा, परंतु मनुष्यबळाअभावी शहराची ही दुरावस्था दूर करणे अतिशय निकडीचे आहे, आणि याही अवस्थेमध्ये, जसे काही रस्ते लुटारुस अपघातग्रस्त जखमींच्या अंगावरचे शेवटी काय ओरबडून घेता येईल, ते ओरबाडून घेत असतात, तसा बहुतांश लोकप्रतिनिधींकडून मनपा ओरबाडणे एककलमी कार्यक्रम चालू आहे. ज्या पदांच्या हातात शहराचा विकास असतो, त्या महापौर पदावर, सभापती पदावर वगैरे महत्त्वाच्या पदावर असताना सर्रास कागदावर बुजवलेले ओढे–नाले, अधिकाऱ्यांवर दडपण आणून मंजूर करून घेतलेले नदी– नाल्यातले शेकडो ले–आउट यामुळे पावसाळ्यात अहमदनगर नावाचे बेट तयार होते, शेकडो तक्रारी झाल्या, नगररचना विभाग तर 'भ्रष्ट रचना' विभाग झाला आहे, हे आताच्या आयुक्तांवरील कारवाईमध्ये स्पष्ट झाले आहे.

शहर कसं नसावं याचं उदाहरण म्हणजे नगर

संपूर्ण नगर शहरात असा एकही रस्ता वा मूखंड राहिला नाही की, त्या ठिकाणी आगगाडीसारख्या बेकायदेशीर लांबलचक पत्र्याच्या टप्प्या, कुठलीही परवानगी न घेता विकासभार न भरता, प्रत्येक गल्ही–बोळात चालू असलेले गर्डर, टि ॲंगल बांधकामे बेकादेशीरपणे रात्रीतून उभे राहिलेले बांधकाम सर्रास चालू आहेत. अपुरे मनुष्यबळ, धाडसी, निष्पक्ष कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा अभाव, पोलिसांचा असहकार आणि कारवाई करायला गेल्यास लोकप्रतिनिधींचा होणारा हस्तक्षेप, यामुळे हे 'अतिक्रमणनगर' झाले आहे. कुठलेही शहर कसे नसावे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अहमदनगर होय. यात भरीस भर म्हणजे अस्तित्वात असलेल्या मनपा ह्द्दीत स्वतः मनपा कुठल्याही सुखसुविधा द्यायला असमर्थ ठरत असताना, आता त्यात भर म्हणून भिंगारचा देखील मनपामध्ये समावेश करण्यात आला आहे. म्हणजे एखादा बाप स्वतः जन्म दिलेली मुले पोसायला नालायक ठरत असताना त्यांनी अजून चार मुले दत्तक घेतल्यासारखा हा प्रकार आहे. *(पुढील मजकूर पान २ वर)*

अहमदनगर मध्ये प्रथमच, ईदूरचे सर्वात मोठे फॅशन एग्जीबिशन
STYLISTA
FASHION & LIFESTYLE EXHIBITION
राखी आणि तीज एग्जिबिशन
लवकरच येत आहे
07 SUNDAY · 08 MONDAY
JULY 2024
11.00 AM - 10.00 PM
HOTEL YASH GRAND
ANAND NAGAR, RAILWAY STATION ROAD, AHMEDNAGAR
40+स्टाल
₹10,000/- वरील खरेदीवर मोफत चांदीचे नाणे.
For More Info Contact : Chandni @ 9887770374, 9757770754
/ StylistaExhibition @ stylistaexhibition

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

प्रभावी भाषण शिका
फ्री सेमिनार
तुमच्या जीवनातील मोठ्या यशासाठी अतिशय महत्त्वाचा सेमिनार
शनिवार ६ जुलै दु. १२ ते ४ श्री संत गाडगेबाबा उपेक्षा नागरिक संघ द्रौपदी हॉल, गोकुळ कॉलनी, राहुरी.
रविवार ७ जुलै दु. १२ ते ४ MCCIA ट्रेनिंग हॉल, सहाळी चौक, पोस्ट ऑफिस शेजारी, नागापूर, अ.नगर.
7030451333

Sundaram classmate YOUVA
नामांकित कंपनीचे
ए-४ बुकवर
२५% सूट
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ्ड गिफ्ट ॲण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक,
चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधायुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी
२४ तास डॉक्टर
डॉ. शितीष जोंधळे MBBS, MD, M.R.C.P.(London) अ.स. कॉन्सल्टंट
डॉ. अनिल जाधव MBBS, MD अ.स. कॉन्सल्टंट
डॉ. गिरिश बोरुडे MD,MRCP, DNB (MED) Cardiologist & Interventional Cardiologist
डॉ. प्रदीप कंठाळी MBBS DNB (Gen. Medicine) Diabetologist & Endocrinologist
डॉ. मैथिलीताई गायकवाड MBBS, Dip Ortho अस्थिरोग तज्ज्ञ
डॉ. शशिप्रभा सुरासे MBBS, MD (Gynaec/Surgery) स्त्रीरोग तज्ज्ञ
डॉ. प्रतिभा पवार-नाहाटा MBBS, MD (Ped & Gen) बालरोग व अतिदक्षा रोग तज्ज्ञ
डॉ. धनंजय रेवंकर MBBS, MD (Ped & Gen) बालरोग व अतिदक्षा रोग तज्ज्ञ
डॉ. शाम शिवाजी राहीन MBBS, DGO, DNB, FMAS, MNAMS स्त्रीरोग, लहानी रोग व सेलहार विकारतज्ज्ञ
डॉ. गणेश विसपुते MBBS DGO, FPCS, FICPM Fellowship in Reproductive Medicine स्त्रीरोग तज्ज्ञ
डॉ. विनय काळे (कोपरे) MBBS, DGO स्त्रीरोग तज्ज्ञ व लाप्रोस्कोपी तज्ज्ञ
डॉ. जयश्री गायकवाड MBBS, DCH बालरोग तज्ज्ञ व नवजात शिशु तज्ज्ञ
डॉ. शिरीष साळुंखे MBBS, MD (Medicine) DM Nephro किडनी विकार तज्ज्ञ
डॉ. आकाश बोरा MBBS, MD (Medicine) Fellowship in Nephro किडनी विकार तज्ज्ञ
सर्व डॉक्टरांचे सुविधा उपलब्ध
गरीबांना साखर लसणाची
२४ तास आपत्कालीन व ॲम्बुलन्स सुविधा उपलब्ध
ॲलोपॅथिच्या सरळ भलत्यापासून ५०% पर्यंत सवलत
सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथॉलॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्डोस्कोपी, सर्व्हाइकल विकार व इतर तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
इंडो आयरिश हॉस्पिटल
गोरगरीबांसाठी सवलतीमध्ये
पत्ता : तपोवन रोड, सावेडी, अहमदनगर.
फोन : 0241-2423336, मो. 9130423336.
Scan for Direction

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
30 ते 70% डिस्काउंट सेल
आला रे आला राजपाल सेल आला..!
मार्ट असो वा स्मार्ट...मिल असो वा मॉल
सर्वात स्वस्त देणार राजपाल!
myTRIDENT
₹10,000/- खरेदीवर ₹1199/- किमतीचे लक्झरी टॉवेल सेट फ्री
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

खोटं का बोलावं? खऱ्याची दुनिया का नाही?

लाखमोलाचं एक वाक्य सगळ्यांनाच माहित असेल. ''खरं बोलण्याचा एक फायदा असतो आपण काय बोलतो, हे लक्षात ठेवावं लागत नाही.''

हे कळतंय पण तरीही क्याचदा आपण खोटं बोलतो. आपण खोटं का बोलतो? कारण खोटं बोलल्यामुळे आपण एखाद्या अप्रसन्न परिस्थितीपासून पलायन करू शकतो.

खोटं बोलण्यामुळे हानीही होते की, आपल्यामध्ये त्यामुळे 'पलायनवादी वृत्ती' निर्माण होते.

प्रामाणिकपणाचा लाभ हा असतो की, आपल्यामध्ये त्यामुळे 'सन्मखतावादी' वृत्ती निर्माण होते.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

तुम्हाला जर अत्युच्च शिखर गाठायचं असेल तर तुम्हाला आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीला तोंड देण्याची वृत्ती आवश्यक आहे. आणि कोणती गोष्ट ही वृत्ती तुमच्यामध्ये बिंबवू शकेल? तर प्रामाणिकपणा!

केशर्शीई ळी 'हिश इर्शीी झेश्रळलू, प्रामाणिकपणा मग तो स्वभावात, विचारात, वागणुकीत व एकूणच जीवनात असल्यास जीवन सहज, सुंदर व समाधानी होईल. बघा पटतंय का?

अहमदनगरचे नाव आता 'अनाथनगर' किंवा 'अराजकनगर' करा

(पान १ वरुन)

कोट्यावधी खर्चूनही पाण्याची बोंबाबोंब

गेल्या चौदा वर्षांपासून फेज दू ची पाणी योजना चालू आहे. १४ वर्षानंतर रामाचा देखील वनवास संपुष्टात आला होता. परंतु नगरकरांचा वनवास कदाचित १४० वर्षांचा असावा. आतापर्यंत फेज वन, फेज दू आणि अमृत योजना यावर अडीचशे कोटी रुपये खर्च झाले आहेत, तरीदेखील आजही पाण्याची बोंबाबोंबच आहे.

शहरामध्ये १० हजार मालमत्तांच्या नोंदी मनपाकडे झालेल्या आहेत आणि पाणी कनेक्शन मात्र कागदोपत्री पन्नास हजारांच्या पुढे सरकेना. बेकादेशीर नळांच्याबाबत आयुक्तांनी अनेक दंडात्मक आदेश काढूनही सगळेच पाहुण्यांचे मेव्हणे आणि मेव्हण्यांचे पाहुणे असल्यामुळे कोणीच कुणावर कही कारवाई करत नाही आणि प्रामाणिक करदाते मात्र कुतल्याही सुविधा यथार्थपणे मिळत नसताना कंबरडे मोडेपर्यंत घरपट्टी, पाणीपट्टी कर नावाची 'खंडणी' भरत आहेत.

... तर थकबाकी वसुली होणारच नाही

मनपाची कराची ऐतिहासिक थकबाकी २०० कोटी रुपयांच्या पुढे गेलेली असून ही वर्षानुवर्ष तशीच वाढत आहे. आजपर्यंत एकाही प्रशासकीय अधिकाऱ्याने किंवा लोकप्रतिनिधीने धाडसी निर्णय घेऊन व त्याची धाडसी अंमलबजावणी करून कारवाई करून ही थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न देखील केलेला नाही. नवीन आलेला प्रत्येक अधिकारी या मानसिकतेमध्ये असतो की मी काय दोन-तीन वर्षाचा पाहुणा.. कारण ज्या कर्मचाऱ्यांमार्फत या कारवाया करायच्या आहेत, ते वर्षानुवर्ष त्याच त्या पदावर ओळखी-पाळखीतून काम करत असल्यामुळे कोणीच कुणालाच घाबरत नाही. ही थकबाकी कधीच वसूल होणार नाही.

वशीलेबाजीमुळे झाली महा'नरक'पालिका

मनपाचा प्रशासकीय खर्च कधीच ३५% च्या आत येणार नाही आणि या जन्मात तरी आकृतीबंधाच्या नियमानुसार मनपामध्ये नवीन नोकरभरती होणार नाही. काही फुटकळ तांत्रिक पदे कंत्राटी पद्धतीने भरायला मंजुरी मिळवली खरी परंतु तिथे देखील लोकप्रतिनिधींकडून पाव्ह्याचे मेव्हणे आणि मेव्ह्याचे पाहुणे यांचीच वर्णी लागण्यासाठी चढाओढ चालू आहे. त्यामधून अपात्र तेच शेवटी भरले जाणार. या महानगरपालिकेची अशाच गोष्टींमुळे 'महानरक'पालिका झाली आहे. जून २०२३ मध्ये तर बहुतांश जुने कर्मचारी निवृत्त झाले. आता जाणकार असे कोणीच उरले नाही. 'आंधळं दळतं आणि कुत्र पीठ खातं' अशी मनपाची अवस्था आहे.

रस्त्यांची अतोनात दुरावस्था

रस्त्यांच्याबाबत तर अतोनात दुरावस्था आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी निधी आला, टेंडर निघाले, वर्क ऑर्डर दिल्या गेल्या परंतु अद्यापपर्यंत बहुतांश गावठाणात फक्त खडीचे ढिगारे आहेत. सगळ्या नव्याने थातूरमातूर का होईना केलेल्या रस्त्यांचे ड्रेनेजचे झाकणं परत रस्ता खोल खोदून उघडून परत बसवायचे कामं चालू आहेत, असा मूर्खपणा फक्त नगरमध्येच घडू शकतो.

स्वच्छतेत बक्षीसे पण वास्तवात अस्वच्छताच

स्वच्छतेच्याबाबत तर जणू असे घडत आहे की, मानांकन देणारी समिती शासकीय विश्रामगृहावरच गळे आले सुके कसन, मानांकन तरवून जाते की काय? आपल्या मनपाला स्वच्छतेची बक्षीस मिळाल्याचा फोटो छापून आला होता, त्यावेळेस सगळे नगरकर पोट धरून हसले होते. पूर्ण नगर शहरात एकही सार्वजनिक शौचालय चांगल्या अवस्थेत नाही. मुतारीमध्ये जाऊन लघुशंका करणे हे एक बक्षीसपात्र धाडस ठरते आहे. इतक्या त्या मुताऱ्या अस्वच्छ आणि घाणेरड्या आहेत. एकंदर काय तर ही महानगरपालिका राहिलेली नसून 'महानरकपालिका' झालेली आहे.

मुख्यमंत्र्यांनी शहराचे 'नाथ' होऊन 'अहिल्योद्धार' करावा

मुख्यमंत्री किंवा नगर विकास कार्यालय यांच्यासमोरे हे चित्र कधीच आणि कोणाकडून वास्तव आत नाही. त्यांची देखील कधी प्रामाणिक इच्छा हे सत्य जाणून घेण्याची दिसलेली नाही, त्यामुळे नुसते 'ऑल इज वेल' असे कागदी घोडे नाचवल्यामुळे खरी भीषण वास्तवता उच्चस्तरीय मंत्र्यांना समजूच शकत नाही. मुख्यमंत्री आपले नाव एकनाथ आहे, आपण एकतर या शहराचे 'नाथ' व्हावे आणि याचा 'अहिल्योद्धार' करावा किंवा कोणे एकेकाळी बगदाद आणि कैरो शहरांच्या स्पर्धेत उत्तरू पाहणाऱ्या या शहराचे नाव पुन्हा एकदा बदलून 'अराजकनगर' करावे. कारण इतका घाणेरडा कारभार असलेल्या या शहराचे नाव 'अहिल्यानगर' असावे, हे त्या कर्तृत्वान, महान अहिल्याबाईंचा अपमानच आहे.

निवडणुका झाल्यास पुन्हा तोच ओला-सुका कचरा अन् खाऊगिरी

आता 'मेभेवी येतो पावसाळा' या उक्तीनुसार पुन्हा निवडणुका येतील. तीच टक्केवारी खाणारी जुनी मंडळी दोन दोन हजार रुपयाला मते विकत घेऊन, निवडुन येतील, म्हणजे पुन्हा तोच ओला सुका कचरा .. तीच खाऊगिरी! त्याच तिकिटावर तोच खेळ.

या निवडणुका घेण्याचा फार्स करण्यापेक्षा किमान पाच वर्ष या महापालिकेवर अतिशय शिस्तबद्ध कर्तव्यदक्ष शक्यतो आयएएस दर्जाचा अधिकारी प्रशासक म्हणून नेमला तर सर्व थकबाक्या वसूल होतील, कर्मचारीही आत्मविश्वासाने आणि कठोरपणे कार्यक्षमतेने काम करतील, अतिक्रमणे, रस्ते, बेकायदेशीर पानी कनेक्शन, आलेल्या टेंडर निघींचा गैरवापर हे सर्व नियंत्रणात येईल. त्याच त्या बेगडी निवडणुका, घोडेबाजार,.. निवडून येणारा तोच बिन्डोक घ्रष्ट कचरा व विकासाचा होणारा उकिरडा कुठेतरी थांबवता येईल. याचा आपण गांभीर्यपूर्वक विचार करावा, अशी मागणी नगरकरांच्यावतीने मुळे यांनी केली आहे.

सातव्या वेतनाचा लाभ मिळण्यासाठी शिष्टमंडळ मुख्यमंत्री यांची भेट घेणार

महापालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन मिळण्यासाठी कास्ट्राईबचे प्रधान सचिवांना निवेदन

नगर – अहमदनगर महापालिकेच्या कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होण्यासाठी प्रधान सचिवांना निवेदन पाठविण्यात आले आहे. या प्रश्नावर कास्ट्राईबच्या जिल्हा परिषद येथील कार्यालयात बैठक पार पडली. यामध्ये शिष्टमंडळ लवकरच मुख्यमंत्री यांच्या भेटीला जाणार असल्याची माहिती कास्ट्राईबचे राज्याध्यक्ष एन.एम. पवळे यांनी दिली.

कास्ट्राईबच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत पवळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करुन राज्यातील बहुतांश महापालिकेतील कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू आहेत. मात्र अहमदनगर महापालिका यापासून वंचित राहिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी रंगनाथ गावडे, वसंत थोरात, लक्ष्मण जगताप, मंजूर शेख, रामदास वखारे, कदम उपस्थित होते.

अहमदनगर महापालिकेने शासनाने दिलेल्या सूचनेप्रमाणे आस्थापना खर्चाची टक्केवारी कमी करून, उत्पन्न वाढीचे नियोजन केले आहे. तर आस्थापना खर्चाची टक्केवारी नियंत्रित कशी ठेवता येईल? त्याबाबत सविस्तर अहवाल सादर केला आहे. त्याबाबत महापालिकेने सविस्तर प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याची संपूर्ण प्रत प्रधान सचिवांना पाठविण्यात आली असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश महापालिकेत कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू आहेत. त्या धर्तीवर अहमदनगर महापालिकेने ४ मार्च २०२४ रोजी सादर केलेल्या अहवाल नुसार सातवा वेतन आयोगाला मंजुरी मिळण्याची मागणी कास्ट्राईबच्या वतीने करण्यात आली आहे.

बंगाल चौकी येथे मोकाट जनावरांवर ॲसिड हल्ला

नगर – बंगाल चौकी येथे मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे सोडलेले आहेत. काल रात्री अज्ञात समाजकंटकांनी सहा ते सात मोकाट जनावरांवर ॲसिड फेकून हल्ला करण्यात आला आहे. यामुळे येथील जनावरे मोठ्या प्रमाणात जखमी झाले आहेत. घटनेची माहिती कळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले होते. मनपा कर्मचाऱ्यांनी जखमी जनावरांना औषधाची फवारणी केली आहे. या परिसरात अनेक वर्षांपासून मोकाट जनावरे व कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात संख्या आहे. यामुळे या परिसरातून जाताना नागरिकांना भीती वाटत असते. अनेक वेळा मोकाट जनावरांची झुंज तसेच जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना कुत्रे चावा घेत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिकेने मोकाट जनावरांचा व कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नगर – भिंगारच्या महेशनगरमध्ये एका तरूणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. अक्षय विजय शिंदे (वय २८ रा. महेशनगर, भिंगार) असे मयत तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अक्षय विजय शिंदे यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे बुधवारी (३ जुलै) सकाळी सात वाजता उघडकीस आले. त्यांना उपचारासाठी त्यांचे नातेवाईक अजय शिंदे यांनी जिल्हा रूग्णालयात दाखल केले. त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. ढगे यांनी घोषीत केले. तशी माहिती त्यांनी रूग्णालयात नेमणूकीस असलेल्या पोलिसांना दिली.

पोलिसांनी दिलेल्या खबरीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, अक्षय यांनी गळफास घेऊन आत्महत्या का केली, याची माहिती समजू शकली नाही. पोलीस अंमलदार एम. टी. विधाते अधिक तपास करत आहेत.

चंद्रभागाबाई पवार यांचे निधन

नगर – चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवासी चंद्रभागा हरिभाऊ पवार (वय ७५) यांचे १ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती हरिभाऊ पवार, मुलगा बाबासाहेब पवार, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

माजी सब रजिस्ट्रार बाबासाहेब साबळे यांचे निधन

नगर – महाराष्ट्र शासनाच्या खरेदी विक्री रजिस्ट्रार होणारे दुय्यम निबंधक कार्यालयाचे माजी सब रजिस्ट्रार बाबासाहेब यशवंत साबळे (वय ९०) यांचे ५ जुलै रोजी पहाटे दुःखद निधन झाले. कै. साबळे यांच्या पाठीमागे विवाहीत तीन मुले, विवाहित मुलगी, नातवंड असा परिवार आहे.बालाजी कॉलनी,केडगांव येथे त्यांच्या राहत्या घरी त्यांचे निधन झाले.

कै. साबळे यांनी संगमनेर, पाथर्डी, शेवगांव,पारनेर, नगर,जामखेड येथे सब रजिस्ट्रार म्हणून काम पाहीले. त्यांना वृत्तपत्र वाचन करण्याची मोठी आवड होती. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी संजय साबळे यांचे ते वडील होत.

श्रीमती चंद्रकला हिरण यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील श्रीमती चंद्रकला झुंबरलाल हिरण (वय ७०) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. सुभाषचंद्र, सुरेशचंद्र व शांतीलाल हिरण यांच्या मावजई,जीवन एजन्सीज्चे मालक पंकज हिरण व स्व.गौतम हिरण यांच्या त्या मातोश्री होत.

कांदा आणि दूध दराच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'जनआक्रोश'

खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली गायी, म्हशी, बैलगाडीसह आंदोलनात सहभागी झाले शेतकरी

नगर – निर्यातबंदीमुळे कांद्याचे कोसळलेले भाव तसेच दुधाच्या दरात झालेल्या कपातीच्या निषेधार्थ खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी जनावरांसह शेतकरी जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना निवेदन सादर केले.

राज्यातील कांदा व दुध उत्पादक शेतकरी योग्य भाव न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. दुधाचे भाव गेली वर्षभर सातत्याने कोसळत आहेत. सध्या दुधाला मिळणारा भावमध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून निघत नसल्याने राज्यातील शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली खरी परंतू अनुदानाच्या जाचक अटी व शर्तीमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही. नुकतीच केंद्र सरकारने दहा हजार टन दुध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे ही आयात करमुक्त असल्यामुळे दुध उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसणार आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेती तोटयात जाऊ लागली आहे. वाढलेली महागाई, नैसर्गिक अपत्ती, खतांचे वाढलेले दर, सरकारचे शेतीमालासंदर्भातील चुकीचे धोरण, रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे यांच्या माध्यमातून जी. एस.टी. चा शेतकऱ्यांवर बोजा पडलेला आहे. मात्र देशभरातील जनतेला अन्नधान्य पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर सरकारला दिसत नाही. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने संपूर्ण कर्जमाफीसह ताकाळ विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे.

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये दुध आणि शेतीमालाच्या हमी भावाबरुन प्रचंड असंतोष आहे. यासाठी अनेक शेतकरी संघटना विविध आंदोलने करीत आहेत. शेतकऱ्यांच्या दुधाला ४० रुपये दर मिळावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, कांदा व दूध शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा अशी मागणी करत शेतकरी, दुध उत्पादक तसेच विविध शेतकरी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोरावे, विक्रम राठोड, अभिषेक कळमकर, संदेश कार्ले, शरद झोडगे, प्रकाश पोटे, योगीराज गाडे, किरण काळे, सुनील क्षेत्रे आदी उपस्थित होते.

कांदा आणि दुध दराच्या प्रश्नावर जनआक्रोश मोर्चा घेवून बैलगाडीतून आलेले खासदार निलेश लंके. समवेत महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते पहिल्या छायाचित्रात तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांनी बांधलेली जनावरे दुसऱ्या छायाचित्रात. (छाया – उदय जोशी, लहू दळवी)

जमावाने केलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू

नगर – शेळ्या चोरीच्या संशयावरुन जमावाने केलेल्या मारहाणीत एका तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील पांगरमल शिवारात गुरुवारी मध्यरात्री घडली. चांगदेव नामदेव चव्हाण (वय २५ रा. पखोरा, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे मयत तरूणाचे नाव आहे. मारहाणीत एका महिलेसह तिघे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

जखमी महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून पांगरमलचे सरपंच अमोल आव्हाडसह सहा व इतर अनोळखी २० ते २५ जणांविरूध्द खून, विनयभंग, ॲट्रोसिटी आदी कलमानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरपंच अमोल आव्हाड, महादेव आव्हाड (पूर्ण नाव नाही), उध्दव महादेव आव्हाड, आजीनाथ महादेव आव्हाड, गणेश अंबादास आव्हाड, संदीप पंढरीनाथ आव्हाड (सर्व रा. पांगरमल) व गावातील इतर अनोळखी २० ते २५ जणांविरूध्द ही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील महादेव आव्हाड, उध्दव आव्हाड, गणेश आव्हाड व संदीप आव्हाड यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. ३० वर्षीय फिर्यादी महिला नगर तालुक्यातील एका गावातील रहिवाशी असून तिच्या मुलासह चांगदेव चव्हाण व प्रवीण भोसले (पूर्ण नाव, पत्ता नाही) गुरुवारी मध्यरात्री साडेबारा ते दीड वाजेच्या दरम्यान पांगरमल गावात असताना गावचा सरपंच अमोल आव्हाड व इतरांनी हातात कुर्हाडी, कोयते व लाकडी दांडके घेऊन फिर्यादी महिला, तिचा मुलगा, चांगदेव व प्रवीण यांना शेळ्या चोरी करण्यासाठी आल्याच्या संशयावरून बेदम मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी महिलेसह तिचा मुलगा व प्रवीण जखमी झाले तर चांगदेव यांचा मृत्यू झाला. उध्दव आव्हाड व एका अनोळखी व्यक्तीने फिर्यादीसोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. जातीवाचक शिवीगाळ करून जिवंत ठार मारण्याची धमकी दिली. जमावाने जिल्हाधिकारी यांनी लागू केलेल्या जमावबंदीचे उल्लंघन करून दुचाकीचे नुकसान केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, चोरीच्या संशयावरून चौघांना पकडून मारहाण केल्याची माहिती गावातीलच व्यक्तीने एमआयडीसी पोलिसांना दिली. पांढरीपुल परिसरात रात्र गस्तीवर असलेले एमआयडीसी पोलिसांचे एक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मारहाणीत जखमी झालेल्या चौघांना रूग्णालयात दाखल करण्यात आले. यातील चांगदेव चव्हाण यांना डॉक्टरांनी मृत घोषीत केले. पोलिसांनी रात्रीतून चौघांना ताब्यात घेतले असून इतर संशयित आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

जिल्हास्तरीय 'रेड रन व रेड रिबन' प्रश्नमंजुषा स्पर्धेचे नगरमध्ये आयोजन

नगर – युथ फेस्टीव्हलअंतर्गत जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेचे १२ जुलै रोजी तर रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे १५ जुलै रोजी आयोजन करण्यात आले असुन या स्पर्धामध्ये अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी केले आहे. रेड रन स्पर्धेचे आयोजन १७ ते २५ वर्ष वयोगटातील रेड रिबन क्लब असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असणार असुन ही स्पर्धा पाच किलोमीटर अंतराची असणार आहे. ही स्पर्धा पुरुष व महिला या दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी **https://forms.gle/582T1Z47nPbvCEmZ6** या लिंकद्वारे करता येऊ शकणार असुन ही लिंक ५ जुलै रोजी सायं. ५ वाजेपर्यंत खुली राहणार असुन १२ जुलै रोजी ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. महिला व पुरुष गटामध्ये स्पर्धेत यशस्वी ठरणाऱ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय असे बक्षीसही देण्यात येणार आहे.

रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पर्धा ही १३ ते १७ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेत १०० विद्यार्थ्यांनाच सहभागी होता येणार असुन या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी **https://forms.gle/QWWd7buvJdFFbbSb8** या लिंकवर करता येऊ शकणार असुन ही लिंक ५ जुलै रोजी सायं. ५ वाजेपर्यंत खुली राहणार असुन १५ जुलै रोजी ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिसेही देण्यात येणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

गृहिणी

आरोग्य

स्वास्थ्य राखण्यासाठी

आज सगळीकडे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण आहे आणि आजच्या भेसळीच्या युगात फळे ही औषधासारखे काम करतात. मोठ्यातल्या मोठ्या आजाराशी लढण्याची शक्ती फळांमुळे मिळत असते. निसर्गाची एक खूप मोठी देणगी म्हणजे ही फळे आहेत. जर ऋतूनुसार तुम्ही तुमच्या आहारात फळांचा समावेश केला तर तुम्ही आजारांपासून दूर राहू शकाल.

पाककला

हरबरा डाळीचे रसम

साहित्य – एक वाटी हरबरा डाळ, पाऊण किलो टोमॅटो, आठ–दहा काळी मिरी, दोन मोठे चमचे जिरे, तीन–चार लाल मिरच्या, चवीला मीठ, तीन–चार लसूण पाकळ्या ठेचून, कोडणीसाठी पाव वाटी तेल, मोहरी, हिंग, पंधरा–वीस कढीलिंबाची पाने, कोथिंबीर.

तयारी – मिरी–जिरे–मिरच्या भाजून पूड करावी. टोमॅटो शिजवून मिक्सरमध्ये फिरवून एकजीव करून घ्यावे. हरबरा डाळ कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावी आणि गार झाल्यावर मिक्सरमधून काढून घ्यावी.

कृति – शिजवलेल्या डाळीत पाणी आणि टोमॅटोचा रस घालून उकळत ठेवावे. हवे तसे पाणी घालावे. मीठ, मसाला घालावा. तेलाची फोडणी करून त्यात कढीलिंब, लसूण घालून खाली उतरवावे. झाकण ठेवावे. कोथिंबीर घालावी. रसम पातळच असावे.

सल्ला

कपड्यांवरील शाईचे डाग घालविण्यासाठी

कपड्यांवर शाईचे डाग पडले असतील तर त्यावर लिंबाची चतकोर फोड घालून कपडा चटकन धुवून टाका.

वास्तू

दिव्यात गाईचे तूप घालून तो जळत ठेवल्यास त्या घरात आनंद व शांती निर्माण होते.

सौंदर्य

त्वचेला ओलसरपणा आणण्यासाठी

मॉइश्चरायझर वापरतात. आपल्याला ते घरच्या घरी तयार करता येतो. ते असे ताज्या लिंबाचा रस २ चमचे + २ चमचे ग्लिसरीन. यात ६ थेंब रोझ वॉटर टाका. हे सर्व मिश्रण चांगले हालवून एक करा. नंतर ते स्वच्छ कोरड्या बाटलीत घालून फ्रीजमध्ये ठेवावे. रात्री झोपण्यापूर्वी हे मिश्रण अर्धा तास चेहऱ्यावर चोळून जिरवावे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शनिवार, दि. ६ जुलै २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पुनर्वसु २८।४८

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य–

मेष : आपण पूर्वीपासून असलेल्या योजना यशस्वी होतील. महत्वपूर्ण कार्यामध्ये यश मिळेल. व्यापार–व्यवसायात प्रगती होईल. आपले सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. अनेक व्यावसायिक लाभ होतील.

वृषभ : आपल्या आवडी–निवडीप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वात उत्तम आहे. निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. कार्यात सहकार्याचा सहयोग मिळेल.

मिथुन : आजचा दिवस जोमदार ठरेल. आपले अनेक दिवसांपासूनची उद्दिष्टे पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. शत्रू वर्गाचे डावपेच वाया जातील. वाहन चोरी होण्याची शक्यता आहे.

कर्क : दिवस संमिश्र जाईल. संपत्तीच्या खरेदी–विक्रीसाठीही उत्तम दिवस. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. हितशत्रू डोके वर काढतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या.

सिंह : आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी कराल. आर्थिक बाबतीत उन्नती होईल.

कन्या : धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यामध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील. आपल्या क्रोधावर संयम ठेवाल.

तूळ : राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल. आनंदाची बातमी मिळेल. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

वृश्चिक : महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क वाढविले राहतील. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील. आरोग्य उत्तम राहील. शत्रू वर्गापासून दूर राहा. व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील.

धनु : दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकलेले कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण आनंददायक राहील. बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यावाहीत खोळंबा निर्माण करू शकते. घराच्या विषयांमध्ये वेळ उत्तम. अनावश्यक चिंता टाळा.

मकर : व्यापार–व्यवसायाशी आज दिवस उत्तम राहील. एखाद्या मित्राचे प्रशंसनीय सहकार्य मिळेल. आरोग्याच्या दृष्टीने उत्तम वेळ आहे. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल. वाहने काळजीपूर्वक चालवा.

कुंभ : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. मित्र आनंद देतील. आपली योजना बनवण्यात सावधगिरी बाळगा.

मीन : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे. व्यापार–व्यवसायात उत्तम स्थिती राहील. वाहने काळजीपूर्वक चालवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९६० सौ.शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :– १) हे पिल्यानंतर मृत्यू येत नाही असे म्हणतात ३) गडबड; गलका; गलबला ६) वर्ण; रंग; कास्ट ८) गळ्याची मागची बाजू; आदर ९) निधन; मृत्यू; देवज्ञा १३) मोजेखातर केलेला प्रवास; टूर १४) मेलेला; जीव गेलेला १६) बिनवासाचे एक फूल १७) विश्व; दुनिया १९) गुप्तता; संरक्षण; गुपित २१) कवाड; दरवाजा २२) पेटीसारखा मोठा करंडा २४) रम्य दिसेल असे; सुंदर २५) रासभ; लंबकर्ण; गाढव

उभे शब्द :– १) एक प्राणी; बोकड; बकरा २) निर्जीव शरीर; प्रेत; शव ४) हमी; जामीन ५) दाट झाडी असलेले स्थळ ७) महादेवाचे उपासक १०) अवस्था; दशा; वाईट अवस्था ११) समुद्रातील गुळगुळीत दगड; गजगा १२) जीव; चेतना; हृदयस्थ वायू १३) समज असलेला; ज्ञानी; शहाणा १५) जुना; पुरातन १८) उष्ण; तप्त २०) फुलातील रजःकण २२) पिण्याचे द्रव २३) षड्रिपूंपैकी एक; ढोंग

शब्दगंध क्र. ६९५९ चे उत्तर

प	रि	ध	■	■	मा	र	क
रा	क्ष	स	म	र	सु	क्ष	त्र
त	म	■	ध	ज	■	■	■
दे	ह	क्षी	ण	■	वा	चा	■
गा	क	र	■	प	र	म	■
व	ल	■	भ	■	मे	■	खो
क	■	पु	र	ली	■	बो	ल
ती	त	भा	त	■	क्ष	त्र	■

फिल्मीचक्कर क्र. ११४५ चे उत्तर

ला	ड	ला	■	■	आ	य	मि	ली
खो	■	सा	दी	■	■	■	रा
सी	■	■	■	■	■	ई	ला
बा	■	■	■	■	■	■	■
ल	■	■	■	■	■	■	■
■	■	■	■	■	■	■	■
■	■	■	■	■	■	■	■
■	■	■	■	■	■	■	■

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : स्वर्गापेक्षा चांगल्या पुस्तकांचे मी अधिक स्वागत करीन. कारण पुस्तके जिथे असतील तिथे स्वर्ग निर्माण होतो.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

डॉक्टरांच्या गाड्या, रुग्णालये यावर रेडक्रॉसची खूण का असते?

हेन्री ड्यूनॉट या स्वीस व्यापाऱ्याने १८५९ मध्ये उत्तर इटलीतून प्रवास करताना सॉलफेरीनोचे युद्ध पाहिले. जखमी सैनिकांच्या मदतीसाठी त्याने स्वयंसेवक गोळा केले व मदतकार्य केले. नंतर सर्व युरोपभर फिरून त्याने युद्धातील जखमींना मदत करण्यासाठी निष्पक्ष अशी स्वयंसेवी संघटना अस्तित्वात यावी यासाठी प्रचार केला. त्यांच्या प्रयत्नामुळे १८६४ साली 'रेडक्रॉस' ही अराजकीय, अशासकीय अशी मानवतावादी आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात आली. सुरुवातील युद्धातील जखमी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना मदत करणारी ही संघटना गेल्या काही दशकात नैसर्गिक आपत्ती, आरोग्य समस्या, रक्तदान अशा अनेक प्रकारच्या मदतकार्यात सहभागी होत आहे.

'लाल फुली' हे या संघटनेचे चिन्ह होय. रेडक्रॉसचे स्वयंसेवक, त्यांच्या गाड्या ओळखू याव्यात हा या चिन्हाचा उद्देश होता. त्यामुळे हे चिन्ह बाकी कोणी वापरत नसे. कालांतराने सैन्यदलाचे डॉक्टर व त्यांची वाहने इत्यादींसाठी हे चिन्ह वापरले जाऊ लागले. सध्या सर्व डॉक्टर्स, त्यांच्या गाड्या व रुग्णालये यांवर हे चिन्ह सर्रास वापरले जाताना दिसते. त्यामुळे असा वापर रूढ झाला आहे. एका विशिष्ट संघटनेचे चिन्ह असलेली ही 'लाल फुली' समाजात एवढी रूढ झालीय, की 'लाल फुली' म्हणजे 'वैद्यकीय सेवेची उपलब्धता' असा त्याचा अर्थ आपोआप ध्वनित होतो. त्यामुळेच डॉक्टरांच्या गाड्या, रुग्णालये इत्यादींवर रेडक्रॉसची खूण असे.

रेडक्रॉसचे हे चिन्ह डॉक्टर व रुग्णालये यांनी वापरू नये असे सांगितले आहे. त्यामुळे आता अनेक डॉक्टर व रुग्णालयांवर लाल फुलीचे चिन्ह आढळून येत नाही. त्याऐवजी नवीन चिन्ह पाहायला मिळते.

लांडग्याचे कपट

एका रानडुकरीला बरीच पिल्ले झाली. त्यांना घेऊन ती आडोशाला बसली. पलीकडच्या गवतात एक लांडगा बसलेला होता.

त्याची नजर त्या पिलांवर पडली. त्यातील एखादे पिलू तरी खायला मिळावे असे त्याला वाटू लागले. पण डुकरी पिलांना एकटे सोडून कुठे जात येत नव्हती. म्हणून मग

''पिले तुझीच, पण सतत येथेच बसून तुझी उपासमार होत असेल. तेव्हा तू थोडा वेळ बाहेर जा आणि काही खाऊन ये.''

त्यावर डुकरी म्हणाली,

'' नको रे बाबा, तुझ्या ताब्यात पिलांनं देऊन मी बाहेर जायला मला काय दूधखुळी समजलास.

मी गेल्यावर माझ्या पिलावर ताव मारायला तुला रान मोकळे सोडू? चल, तोंड काळे कर कुठे तरी.

तात्पर्य : कपटी माणसांच्या दयाळूपणाला भुलू नये.

जीवन चक्र

कोणाला माहित, भविष्यामध्ये काय होईल? जेव्हा आपण म्हातारे होऊ तेव्हा आपली तब्येत आपल्याला साथ देईल का ज्या गोष्टीसाठी आपण जीवनभर वाट बघितली. आध्यात्मिक कार्य आपण वृध्द अवस्थेत करु असे ठरवतो, पण आपल्याला खरेच वेळ मिळणार आहे का किंवा आपण योग्य वेळ अध्यात्मिक कार्यासाठी देऊ शकू का?

आपला वेळ आपण कसा घालवतो, याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. जर असे वाटत असेल की, दुसरे काही महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे, तर जीवनभर आपण त्यासाठी वेळ काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरजेपेक्षा जास्त धन कमावण्याच्या प्रयत्नामध्ये आपण इतर सर्व महत्त्वपूर्ण उद्दीष्टांची उपेक्षा नाही केली पाहिजे. वेळेवर योग्य नियंत्रण ठेवून आपण असे सुनिश्चित केले पाहिजे की धन आणि संपत्तीमुळे जे तणाव निर्माण होतात त्यामुळे आम्ही आमच्या शांती व संतोषास गमावू नये. आपला वेळ आणि जीवन आपण कसे व्यतीत करत आहोत, याबद्दल जागृती असणे हे जास्त महत्त्वपूर्ण आहे. आपण आत्म्याचे ऐकले तर आंतरीक शांती आणि संतोष मिळवणे हे संसारातील संपूर्ण धन–संपत्ती मिळवण्यापेक्षा अधिक मौल्यवान आहे. आपल्या दैनंदिन जीवनात अनेक संकटांना, अडचणींना आणि निराशेचा सामना करावा लागतो. सर्व शक्ती आपल्या मतानुसार नाही घडत. जर आपण दुसऱ्याच्या बोलण्यावरून तसेच स्वतःच्या विचारांवर आणि वचनावर लक्ष दिले तर असे लक्षात येते की बऱ्याच जणांनी अशी तक्रार असते की आपल्या जीवनामध्ये काही वेगळेच घडत आहे. जीवन हे आपल्याला बऱ्याच वेळेस कडू वाटते आणि बदल्यात आपल्याला कडवटपणाने भरून देते.

कधी आपण आपल्या जीवनाच्या बाबतीत वेगळ्या दृष्टीकोनातून विचार केला का? आपण किती भाग्यवान आहोत याचा विचार केला पाहिजे. खरे तर आपण मनुष्य आहोत. या पृथ्वीवर किती प्रकारचे जीव राहतात? जेथे (चतुस्पाद) जमीनीवर सरपटणारे प्राणी तसेच कीडे, जंतू इ. असतात. अनेक प्रकारचे जीव हवेत आणि पाण्यात देखील असतात. आपण सौभाग्यशाली आहोत की आपण मनुष्य योनीमध्ये जन्माला आलो.

आपल्यातील असे किती लोक आहेत की जे मनुष्य जन्म मिळाल्यावर प्रभुचे आभार मानतात ? किती जणांनी जीवनासाठी प्रभुला ईश्वराला धन्यवाद दिले. जेव्हा काही चुकीचे घडते तेव्हा आम्ही ईश्वराकडे तक्रार करतो, परंतु त्या शेकडो वस्तुंबद्दल काय ज्या ईश्वराने आपल्याला दिल्या आहेत? ईश्वराने आपल्याला जेवण दिले ज्यामुळे आपण आजपर्यंत जगत आहोत. कपडे आणि घराद्वारे आपण उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळ्यापासून वाचतो.

आपल्या पैकी बहुतेकांचा परिवार असतो, जेथून आपणास प्रेम मिळते. आपल्याला वेगळ्या वेगळ्या प्रकारे शिक्षण मिळते त्यामुळे आपण काही कामकाज करतो.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

ऐसी भावना से मन को हल्का कर, पूरी फसल को दृष्टि देकर यह चित्र देखो कि सारी फसल हरीभरी हुई है और बहुत अच्छे से बढ़ रही है। ये बातें सुनकर मेरा मन फिर से निर्भय, निश्चित हो गया और फसल को परमात्म शक्ति के प्रकम्पन्न देने शुरू किये। इसके साथ ही पूरी खेती में सप्त–धान्याकुर अर्क का छिड़काव किया जो सात तरह के अनाजों को अंकुरित करके बनाया जाता है जिसके लिये खर्चा भी बिल्कुल कम होता है।

धैर्य और परमात्म शक्ति का असर बहुत जल्दी ही देखने को मिला। सारी फसल १५ दिन होते होते फिर से हरीभरी हो गई, खुशी से झूमने लगी। इस तरह संकल्प शक्ति की करामात के कई अनुभव प्राप्त का कृषि–कृषक और समाज को स्वस्थ–खुशहाल बनानेवाली इस यौगिक खेती के प्रसार हेतु गोवा सरकार के कृषि विभाग के सहयोग से ब्रह्माकुमारी सेन्टर पर एक दिन का प्रशिक्षण शिबिर रखा गया। जिसमें कृषि विभाग के संचालक और कई कृषि अधिकारी शामिल थे।

कार्यक्रम की समाप्ति के बाद अधिकारी श्री. संजीव मयेकरजी ने कहा, ऐसा कभी हो सकता है क्या? सिर्फ अपने संकल्पों से अच्छी फसल कैसे ले सकते हैं? क्या आप हमें सरकारी जमीन पर यह खेती करके दिखा सकते हो? परमात्म शक्ति के अनुभव से हमने तुरंत हाँ कर दी। दूसरे ही दिन निमित्त ब्रह्माकुमारी बहन और कुछ राजयोग के अभ्यासियों का एक ग्रुप लेकर हम उस जमीन पर गये। उस एक एकड़ जमीन पर सिर्फ १२ दिन के चावल के पौधे एस.आर.आई पद्धति से लगाये हुए थे। उसी से ही करीबन ३०० चौरस मीटर का एक प्लॉट दिखाकर हमें कहा कि आज से यह प्लॉट ब्रह्माकुमारीज़ का माना यौगिक खेती का है। आपको यहाँ कोई खाद नहीं डालनी है। आप संकल्प शक्ति से कैसे खेती करते हैं, वो करके दिखाओ।

सबसे पहले हम लोगों ने परमात्मा पिता का लाल, पीला झण्डा इस खेती में लगाया। इससे भी खेती को बहुत फायदा होता है क्योंकि लाल रंग पॉजिटिव एनर्जी को खींचती है और पीले रंग को देखकर, उसे फूल समझकर कीट उस पर अपने अण्डे देते हैं। जब हवा में झण्डा लहराता है तो ये अण्डे जमीन पर गिर जाते हैं, नष्ट हो जाते हैं और फसल की कीटों से रक्षा हो जाती है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

एक नाटककार नाटक बघायला आलेला पाहून रंगभूमीवर चालू असलेल्या नाटकाचा लेखक त्याला मुद्दाम भेटून म्हणाला, 'तुम्ही आलात याचा मला फार आनंद झाला पण आज तुम्ही इकडे कसे काय वळलात?'

'त्याचं काय आहे –' दुसरा नाटककार म्हणाला,

'मला खूप सर्दी झालीय – नि डॉक्टरांनी सांगितलंय की दर्दीची ठिकाणे शक्यतोवर टाळा.'

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



तुझे नेत्र माझे हृदय वितळवितात
ज्या प्रकारे सुर्याच्या चुंबनाने
पर्वत शिखरावरील बर्फ वितळते तसे

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

बाळ आईचे दूध पिते तोपर्यंत हा दुग्धस्राव होणे साहजिक आहे. परंतु ही अवस्था सोडून इतर वेळेला स्तनामधून दुग्धस्राव किंवा इतर स्राव होणे धोक्याचे असू शकते. त्यामुळे त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. एखाद्या वेळेस शरीरातील हार्मोन्स्च्या असंतुलनामुळे तसेच पियुषिका ग्रंथीमध्ये गाठ निर्माण झाल्यामुळे दुग्धस्राव होऊ शकतो. रक्तमिश्रीत स्राव येत असल्यास बऱ्याचदा कर्करोगाची लागण असण्याची शक्यता असते. स्तनांमधून हिरवट रंगाचा काळसर स्राव बाहेर येत असेल तर खराब दूध आणि रक्त साचल्यामुळे हा स्राव निर्माण होऊ शकतो. अशा वेळी लगेच डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करावेत. स्तनांमध्ये गाठी असणे बरेचदा स्तनांमध्ये गाठी तयार होतात. ही गाठ साधी आहे की कर्करोगाची, याचे निदान होणे फार गरजेचे आहे. कर्करोगाचे निदान प्राथमिक अवस्थेमध्ये व्हायला हवे. कारण प्राथमिक अवस्थेतच पूर्ण उपचार घेता येतात व कर्करोगापासून सुटका होऊ शकते.

'स्तनांचे आरोग्य' हा माझा लेख वाचून काही स्त्रिया तपासणीसाठी माझ्याकडे आल्या होत्या. त्यातील दोन–तीन स्त्रियांच्या गाठी नवीनच असल्यामुळे प्राथमिक अवस्थेतच निदान करता आले. त्यातील एकीला कर्करोग होता. लवकर निदान केल्यामुळे ती त्यापासून मुक्त झाली आहे. आज या घटनेला दहा वर्षे होऊन गेली; ती आरोग्यपूर्ण जीवन जगत आहे. बऱ्याचशा स्त्रिया लझेपोटी डॉक्टरांकडे जायला उशीर करतात. त्यामुळे स्तनातील गाठीचे निदान उशिरा होते. कर्करोगाचे निदान उशिरा झाल्यास स्तनांचे ऑपरेशन व केमोथेरपी उपचार करूनही उपयोग होत नाही. त्यामुळे वेळीच सावध झालेले चांगले. प्रत्येक स्त्रीने महिन्यातून एकदा स्तनांचे परीक्षण करायला हवे. सहसा पाळी संपल्यानंतर पहिल्या आठवड्यात ते करावे. रजोनिवृत्ती झालेली असेल अथवा गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया केलेली असेल तर कुठल्याही दिवशी स्तनांचे परीक्षण करावे. ते एकांतात आरशासमोर उभे राहून करावे. स्तनांची तपासणी पुढील प्रमाणे करावी –

१) आरशासमोर उभे राहावे. त्यानंतर दोन्ही स्तनांचा आकार बघावा. तो साधारणतः समान असावयास हवा. त्यानंतर स्तनांच्या त्वचेवर लाली किंवा सूज आहे का हे बघावे; स्तनाग्रांचा आकार बघावा, स्तनाग्रे आत ओढलेली आहेत का हे पाहावे, तसेच स्तनांमधे उंचवटा किंवा खड्डा दिसतो का हे पाहावे.

२) दोन्ही हात वर डोक्यामागे नेऊन स्तनांचे परीक्षण करावे. या अवस्थेमध्ये स्तन उचलले जातात. त्यामुळे स्तनांच्या कलशाकृती आकारामध्ये बदल झाला आहे का ते समजते.

३) डावा हात वर घ्यावा व उजव्या हाताने डाव्या स्तनाची तपासणी सर्व बाजूने करावी. प्रथम स्तनाग्रे हलवया हातानं दाबून बघावीत. त्यामधून द्रवपदार्थ किंवा रक्त, पू येत नाही ना याची खात्री करावी.

४) उजवा हात वर घ्यावा व डाव्या हाताने उजव्या स्तनाची वरीलप्रमाणेच तपासणी करावी.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची आर्थिक स्थिती भरभक्कम

पुढील वर्षी रौप्य महोत्सवानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचा मानस : चेअरमन संतोष गांधी

नगर – सहकारी बँकिंग क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व सुवालालजी गुंदेचा यांनी दूरदृष्टीने स्थापन केलेल्या जैन ओसवाल पतसंस्थेने २३ वर्षाच्या वाटचालीत १०० कोटींच्या ठेवींचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. जून २०२४ अखेर संस्थेकडे १०३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. स्वनिधी ७ कोटी ९८ लाख रुपये असून संस्थेची स्वमालकीची प्रशस्त व भव्य इमारत आहे. कर्ज वितरण ७६ कोटी ९५ लाख रुपये असून यात ३८ कोटींचे सोनेतारण कर्ज, इतर बँकांमधील ठेवी २६ कोटी, वेअर हाउस कर्ज १६.५० कोटी रुपये आहे. पुढील वर्षी संस्था रौप्य महोत्सव साजरा करणार आहे. यानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचा मानस आहे. संस्थेला स्थापनेपासून सातत्याने ऑडिट अ वर्ग प्राप्त झालेले आहे. वर्षभराच्या चेअरमनपदाच्या कारकिर्दीत संस्थेची घोडदौड कायम राखण्यात यश आले आहे. सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्या साधीने संस्था आणखी भरारी घेईल, अशा भावना सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी यांनी व्यक्त केल्या.

संतोष गांधी

समीर बोरा

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन म्हणून वर्षपूर्ती झाल्या निमित्ताने प्रतिक्रिया देताना संतोष गांधी म्हणाले, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने विश्वसनीयता आणि प्रामाणिकपणाला किती महत्व आहे हे आपल्या उत्कृष्ट कारभारातून दाखवून दिले आहे. सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा हे नगरमधील सहकारी बँकिंगमधील अभ्यासू व्यक्तीमत्व होते. आर्थिक संस्थेचे महत्व व त्याव्दारे समाजाची उन्नती कशी साध्य होवू शकते हे त्यांना चांगलेच ज्ञात होते. म्हणूनच त्यांनी जैन ओसवाल सहकारी नागरी पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. सर्वसामान्यांना पत देण्याचे काम त्यांनी केले. छोट्या व्यावसायिकांना मोठी झेप घेण्याची उमेद त्यांनी दिली. त्याचाच परिपाक म्हणून आज संस्थेची झालेली प्रगती आहे.

व्हाईस चेअरमन समीर बोरा म्हणाले, सर्वोत्कृष्ट बँकिंग सेवा, पारदर्शी कारभार आणि सर्वोत्तम व्यवस्थापन यासाठी पतसंस्था नावाजली जाते. संचालक मंडळ विश्वस्त भावनेने काम करीत आहे. ठेवी सातत्याने वाढत असून संस्था कर्ज वसूली प्रभावीपणे होईल याद्दष्टीनेही विशेष प्रयत्न करीत आहे. पतसंस्थेने नेहमीच नाविन्यपूर्ण योजना राबवून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना ठेवींवर अतिरिक्त व्याज देणारी योजना राबविण्यात आली. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. याशिवाय सोनं खरेदीसाठी कर्ज ही अभिनव योजनाही ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे. संस्थेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत असून सभासद, खातेदारांना ऑनलाईने त्यांचे व्यवहार करता येतात. पतसंस्थेकडून वेअर हाऊस कर्ज, सोने तारण कर्ज आदी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. याशिवाय विविध शासकीय कर भरणा, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, संगणकीकृत कामकाज, एस एम एस सेवा, क्यु आर कोड अशा अत्याधुनिक सुविधाही उपलब्ध आहेत. पतसंस्थेची व्यवहार करणाऱ्या प्रत्येकाला आर्थिक सुबत्ता लाभावी, त्यांची स्वप्ने साकार व्हावी यासाठी पतसंस्थेने काय चांगला कारभार करण्यावर भर दिला आहे. आताच्या तीव्र स्पर्धेच्या युगात पतसंस्थेने स्वतःला सिद्ध केले आहे. सभासदांना स्थापनेपासून कायम १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा संस्थेने कायम राखली आहे. संस्थेची स्वमालकीची सुसज्ज अशी भव्य इमारत पाहिल्यावर प्रत्येक सभासदाला मनोमन आनंद होतो.

न्यायालयाच्या आदेशान्वये संचालकांच्या मिळकतीची विक्री करून ठेवीदारांच्या रकमा मिळाव्यात, या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांना देताना श्रीनाथ मल्टीस्टेट अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटीच्या ठेवीदारांचे शिष्टमंडळ.

न्यायालयाच्या आदेशान्वये संचालकांच्या मिळकतीची विक्री करुन ठेवीदारांच्या रकमा त्वरित मिळाव्यात

श्रीनाथ मल्टीस्टेट अर्बन सोसायटीच्या ठेवीदारांची मागणी; शिष्टमंडळाचे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांना निवेदन

नगर – श्रीनाथ मल्टीस्टेट अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटीत ठेवीदारांच्या अडकलेल्या रकमा परत मिळण्यासाठी न्यायालयाच्या आदेशान्वये संचालक मंडळाची मालमत्ता विक्री करण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी सुधीर पाटील यांना ठेवीदारांच्या वतीने देण्यात आले.

गुरुवारी (दि.४ जुलै) ॲड. सुरेश लगड यांच्या मार्गदर्शनाखाली ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांची भेट घेऊन ठेवी परत मिळण्यासंदर्भात चर्चा केली. यावेळी ॲड. लगड, दिनकरराव देवतरसे, अण्णा फुलारी, वसीम सय्यद, बाबासाहेब शेवाळे, सुधाकर डोंगरे, नामदेव गुठाळ, हबीब शेख, प्रतीक बैरागी, गणेश गीते आदी उपस्थित होते.

श्रीनाथ मल्टीस्टेट अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटीचे संचालक मंडळाने ठेवलेल्या ठेवीची रक्कम काढून घेतल्ये, त्याची अफरातफर केलेली आहे. जवळपास एकंदरीत कोट्यावधी रुपयांची अफरातफर होऊन ६५ लाखो रुपयांच्या ठेवी संस्थेत अडकल्या आहेत. याप्रकरणी जिल्हा न्यायालयात सर्व संचालक व मॅनेजर यांच्याविरुद्ध विशेष खटला दाखल आहे. त्या खटल्यात न्यायालयाने शासनाला संचालक मंडळाची शेतजमिनी, मिळकत लिलाव करण्यास परवानगी दिलेली आहे. अनेक ठेवीदार सेवानिवृत्त कर्मचारी असल्याने त्यांना इतर कोणताही उत्पन्न नाही, अशा परिस्थितीत न्यायालयाच्या आदेशाने संचालक मंडळाच्या मिळकती विक्री करून ठेवीच्या रकमा मिळण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे.

राज्यातील शाळांमध्ये कला, क्रीडा आणि कार्यानुभव शिकवण्याची व्यवस्था करा

आ.सत्यजीत तांबेंनी सभागृहात केली मागणी, तज्ञ शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय

मुंबई – शिक्षण अधिकार कायद्यानुसार राज्यातील प्रत्येक बालकाला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. परंतु महाराष्ट्रातील विद्यार्थी अजूनही कला, क्रीडा आणि कार्यानुभव अशा महत्त्वाच्या विषयांच्या शिकवणी पासून वंचित असल्यामुळे या विषयांसाठी अनुभवी शिक्षकांची त्वरित नियुक्ती करा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात केली.

शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून महाराष्ट्रातील शिक्षण विभागाने कला, क्रीडा आणि कार्यानुभव या विषयांच्या विषयांची पदे रिक्त ठेवली आहेत. इतर राज्यांमध्ये या विषयांसाठी अनुभवी शिक्षक आहेत, परंतु महाराष्ट्रातील मुलांना कला व क्रीडा विषय शिकवण्यासाठी विशेष तज्ञ शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. या विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्रातील शाळांमध्ये कला, क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आमदार सत्यजीत तांबे म्हणाले.

याबाबत आमदार सत्यजीत तांबे यांनी शिक्षण मंत्र्यांना २६ मे २०२२ रोजी पत्र देखील लिहिले होते. त्यानंतर २१ जून २०२२ ला याबाबत बैठकीचे आयोजन देखील करण्यात आले होते. परंतु कही तांत्रिक कारणांमुळे ही बैठक होऊ शकली नाही. विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही यासाठी ही बैठक पुन्हा आयोजित करून महाराष्ट्रातील शाळांमध्ये कला, क्रीडा आणि कार्यानुभव विषयांसाठी तज्ञ शिक्षकांची लवकरात लवकर नियुक्ती करावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी विकार व बालरोग तपासणी शिबिरांचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोफत किडनी विकार व बालरोग तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. किडनी विकार तपासणी शिबीर १२ जुलै रोजी सकाळी ९० ते दुपारी २ यावेळेत होणार आहे. यात नेफ्रोलॉजिस्ट डॉ.गोविंद कासट रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहे. अंगावर सूज येणे, लघवी कमी किंवा लाल होणे, किडनी जंतु संसर्ग, डायलेसिस इत्यादी उपचार व निदान करण्यात येईल. महाल्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत केली जातील.

१९ जुलै रोजी मोफत बालरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत शिबिर होईल. शिबिरात सवलतीच्या दरात उपचार केले जाणार आहेत. या शिबिरात बालरोगतज्ज्ञ डॉ.श्रेयस सुरपुरे, पेडिएट्रिक सर्जन डॉ. रुपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ.सोनाली कणसे, डॉ.वैभवी वंजारे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत बालरोग विभाग कार्यरत आहे. २६ बेडचा अद्ययावत एनआयसीयू याठिकाणी आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(ब्रस्त दाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी तज्ज्ञ डॉक्टर्स बालरोग विभागात कार्यरत आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही येथे उपलब्ध आहे. दर शनिवारी मोफत ओपीडी सेवा उपलब्ध असून सोमवार ते शुक्रवार ओपीडी सेवेसाठी ५० रुपये आकारले जातात.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये तसेच एमआरआय २५०० रुपयांत उपलब्ध आहे. हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँकेची सेवा २४ तास उपलब्ध आहे. महावीर भवन येथे रूग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी ३५ रुपयांत भोजन व्यवस्था आहे.

दोन्ही शिबिरांचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क : ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.

श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचा ३७ वा वर्धापन दिन साजरा

नगर – जीवनातला एकही क्षण वाया घालवू नका, वेळेला महत्व द्या, नम्रतेने वागा, जीवनात निराश होऊ नका, असे प्रतिपादन रमाकांत व्यास यांनी केले श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयाच्या ३७ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशनचा ३७ वा वर्धापनदिन साजरा करताना रमाकांत व्यास. समवेत अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, नंदकुमार झंवर, राजेश झंवर, डॉ. शरद कोलते, अरुण झंवर, प्राचार्य राधिका जेऊरकर आदी.

ते पुढे म्हणाले की नमस्काराचे महत्त्व खूप आहे तसेच अभ्यासाबरोबरच धार्मिकतेची आवड ही असणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले विद्यालयात गीतेचे अध्याय पाठांतर स्पर्धा आयोजित करून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस त्यांच्या परिवारातर्फे त्यांनी १००० रुपये रोख बक्षीस जाहीर करून या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी त्यांचा सत्कार संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीगोपाल धूत होते ज्ञानदानाचे कार्य करणारी विद्यालयाची ही इमारत गेल्या ३६ वर्षापासून भक्कमपणे उभी आहे तसेच प्रगती साधण्यासाठी संतांच्या मार्गाने जाणे आवश्यक आहे असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले त्यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांच्या हस्ते करण्यात आला.

दीप प्रज्वलनाने तसेच सरस्वती व डॉगरे महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्रीराम व श्रीकृष्णाच्या भजनाने वातावरण प्रसन्न झाले होते यावेळी राधे कृष्ण राधे श्याम, मेरा आपकी कृपा से, तुम उठो सिया शृंगार करो, नादातूनीया नाद निर्मितो या भजनाने सर्वश्रोते मंत्रमुग्ध झाले.

महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार यांनी सर्वांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या त्यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांच्या हस्ते करण्यात आला

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय समितीचे अध्यक्ष नंदकुमार झंवर, संस्थेचे उपाध्यक्ष राजेश झंवर, संस्थेचे सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, संस्थेचे विश्वस्त नंदकिशोर शहा, जगदीश झालानी, रवींद्र गुजराथी, पुरुषोत्तम पटेल, लक्ष्मीकांत झंवर, मधुसूदन सारडा, रामसुख मंत्री, अरुण झंवर, नंदलाल मणियार, प्रकाश गांधी, योगेश्वरजी व्यास इत्यादी उपस्थित होते.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, समन्वयक संपदा देशपांडे, सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथींचा परिचय सौ. रोथेल लोंढे यांनी करून दिला. शाळेच्या स्थापनेविषयी व डॉगरे महाराजांविषयी सौ. उमा जोशी यांनी माहिती सांगितली. सूत्रसंचलन सौ. मुग्धा देवकर यांनी केले. आभार प्रदर्शन समन्वयक सुषमा उजागरे यांनी केले.

६ जुलै रोजी एकनाथ ढाकणे यांचा नगरमध्ये सेवानिवृत्ती गौरव सोहळा

अहमदनगर जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – ग्रामसेवकांचे नेते एकनाथ ढाकणे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा ६ जुलै रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत नगरमध्ये माऊली संकुल साधुसंत, महंत, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, आप्तेष्ट, मित्रपरिवार, नातेवाईक, संघटना पदाधिकारी या सर्वांच्या उपस्थितीत होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय कर्मचारी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष लांबा असतील.

श्री. ढाकणे यांनी अवित्र ३८ वर्ष यशस्वी सेवापूर्ती केलेली आहे. गौरव सोहळ्यात त्यांच्या यशस्वी आयुष्याचे विविध पैलू उलगडून दाखवणाऱ्या 'ग्रामविकासाचा वारकरी' या विशेष गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

या सोहळ्यात एकनाथ ढाकणे यांच्या संघर्षशील जीवनावरील ध्वनिफित दाखवण्यात येणार आहे. तसेच ग्रामसेवा साहित्य प्रदर्शन, संघटना कामकाजाचे चित्र प्रदर्शन असणार आहे. ढाकणे यांच्यासह ११ सेवानिवृत्त ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी यांचाही सपत्नीक गौरव करण्यात येणार आहे.

याच सोहळ्यात अहमदनगर जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी ४ वाजता होणार आहे. यप्रसंगी १५ टक्के डिव्हीडंट, १० टक्के ठेवीवर व्याज असे एकूण १ कोटी ३३ लाख रुपये सभासदांच्या खात्यावर ऑनलाईन वर्ग करण्यात येणार आहेत. तसेच सभासदांचे गुणवंत पाल्य, विशेष गौरवमूर्तींचा सन्मान या ठिकाणी करण्यात येणार आहे. कार्यक्रमानिमित्त उपस्थित सर्वांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाहन पार्किंगची व्यवस्था स्टेट मोनिका अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आली आहे. कार्यक्रमास राज्यातील ग्रामसेवकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेच्यावतीने जागतिक प्लास्टिक दिनानिमित्त जनजागृती व कापडी पिशव्यांचे वाटप करताना प्रभारी आयुक्त सौरभ जोशी. समवेत आर.जे. गायत्री, प्रवीण गारदे, प्रशांत चांदणे आदी. (छाया – लहू दळवी)

प्लास्टिक मुक्तीसाठी सामाजिक जाणीवची खरी गरज

प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांचे प्रतिपादन; अहमदनगर महापालिकेच्यावतीने जनजागृती व कापडी पिशवीचे वाटप

नगर – नागरिक सर्रासपणे प्लास्टिक पिशवीचा वापर करताना दिसत आहे त्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून आरोग्याचा व स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत आहे. प्लास्टिक बंदी ही काळाची गरज असून यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे, शासन मोठ्या प्रमाणात विविध उपक्रम राबवत आहे मात्र नागरिक याकडे दुर्लक्ष करत मोठ्या प्रमाणत प्लास्टिक पिशवीचा वापर करत आहे प्रत्येक नागरिकाने कापडी पिशवीचा वापर केल्यास प्लास्टिक मुक्ती नक्की होईल व आपल्या शहर स्वच्छ व सुंदर राहण्यास मदत होईल प्लास्टिक मुक्ती साठी सामाजिक जाणीवची खरी गरज असल्याचे प्रतिपादन प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांनी केले.

जागतिक प्लास्टिक बंदी दिनानिमित्त अहमदनगर महानगरपालिकाच्या वतीने जनजागृती व कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रभारी आयुक्त सौरभ जोशी, आर.जे. गायत्री, प्रवीण गारदे, प्रशांत चांदणे, प्रशांत उमाप, सुरेश वाघ, बाळासाहेब विधाते, सुरज वाघ, भालेराव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

आर.जे. गायत्री म्हणाल्या, जागतिक प्लास्टिक बंदीनिमित्त गांधी मैदान, चितळे रोड, भिंगारवाला चौक, मोची गल्ही, विशाल गणपती, चाणक्य चौक, पुणे बस स्टॅन्ड येथे कापडी पिशवीचे वाटप करत प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती केली.

प्लास्टिकमुक्त दिनी चित्रकूट गुरुकुलच्या चिमुरड्यांनी केली जनजागृती

नगर – प्लास्टिकमुळे निसर्ग व पर्यावरणाची होणारी हानी जागतिक स्तरावर चिंतेचा विषय बनली आहे. पिशव्यांपासून दैनंदिन वापराच्या अनेक वस्तू प्लास्टिकच्या असतात. त्याचा विपरित परिणाम मानवावर तसेच प्राणीमात्रांवरही होत आहे. त्यामुळे जागतिक प्लास्टिक मुक्त दिन साजरा करून जागृती करण्यात येते.

या दिनानिमित्त सावेडी नाका भिंडे हॉस्पिटल परिसरातील चित्रकूट गुरुकुलच्या नर्सरी ते युकेजीपर्यंतच्या चिमुरड्यांनी अभिनव उपक्रम राबविला. मुलांनी परिसरातील विविध दुकानांना भेटी देवून दुकानदारांना प्लास्टिकच्या पिशव्या न वापरता ग्राहकांना कागदी पिशव्या सामान देण्याचे आवाहन केले.

दुकानदारांना कागदी पिशव्या देऊन प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन

जागतिक प्लास्टिक मुक्ती दिनानिमित्त चित्रकूट गुरुकुलच्या चिमुरड्यांनी दुकानदारांना कागदी पिशव्या देऊन प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन केले. समवेत प्राचार्या सारिका आनंद व इतर शिक्षिका.

प्राचार्या सारिका आनंद यांच्या मार्गदर्शनाखालील या उपक्रमात शिक्षिका हर्षदा गायकवाड, निलम गांगुर्डे, बर्जोस खान, तेजल आव्हाड, दिव्या चव्हाण यांच्यासह सर्व विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते. मुलांनी दुकानदारांना कागदी पिशव्या दिल्या व याच पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन केले. ग्राहकांमध्येही दुकानदारांनी जागृती करावी व प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी योगदान देले पाहिजे असा आग्रह करण्यात आला.

प्लास्टिक पिशव्या अविघटनशील असल्याने पर्यावरणाची समस्या गंभीर होत आहे. रस्त्यावर, उकीरड्यावर फेकलेल्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात. त्यामुळे या प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. प्रत्येकाने कागदी किंवा कापडी पिशव्या वापरल्यास पर्यावरण रक्षणाचे मोठे कार्य त्यांच्या हातून घडू शकते असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

श्री ऋजुप्रज्ञाश्रीजी म.सा. यांचे चातुर्मासानिमित्त ६ जुलै रोजी कापड बाजार जैन मंदिरात आगमन

नगर – कापड बाजार जैन मंदिरात सन २०२४ मध्ये साध्वीजी भगवंत श्री ऋजुप्रज्ञाश्रीजी महाराज साहेब आदी ठाणा ५ यांचा चातुर्मास होणार आहे. यानिमित्त ६ जुलै रोजी सकाळी ८ वा. कापड बाजार जैन मंदिर उपाश्रय या ठिकाणी प्रवेश होणार आहे, अशी माहिती जैन मंदिरचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी दिली.

प्रवेशानिमित्त मुंजोबा स्वीट समोरील अरिहंत ड्राय्फ्रुट येथून सकाळी ७ वाजता सकल संघास्तह वाजत गाजत सवाद्य मिरवणूक निघणार आहे. अरिहंत ड्राय्फ्रुट, जुनी बंगाल चौकी, बुरुडगल्ही कोपरा, संगम चौक, खिस्तगल्ही कोपरा, बालाजी मंदिर, अनिल मेडिकल जुना कापड बाजार रोड, पलक ज्वेलर्स मार्गे जैन मंदिर येथे मिरवणूक पोहचेल. यानंतर उपाश्रयात गुरू महाराज यांचे हिंदीतून जाहीर प्रवचन व मांगलिक होईल. त्यानंतर संघपूजन आणि नवकारसी ठेवण्यात आली आहे.

या पवित्र पर्वा निमित्त पांजरपोळ गोरक्षण संस्थेतील गायींना गुळ, चणा दाळ तसेच हिरवा चारा दिला जाणार आहे. जीवदया हीच आपली संस्कृती आहे. गुरू महाराजांचे आगमन व मिरवणूक यावेळी सकल संघाने सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळाने केले आहे.

नागरदेवळे येथे श्रीकृपा मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्सचे फित कापून उद्घाटन करताना अरुण जगताप.

नागरदेवळे येथे श्रीकृपा मेडिकलचे उद्घाटन

नगर – आलमगीर रोड, नागरदेवळे येथे श्रीकृपा मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्सचे उद्घाटन माजी आ. अरुण जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी मिंगार राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संजय सपकाळ, केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सुधीर लांडगे, मनोज खेडकर, डॉ. कुलांगे, बाजीराव हजारे, महादेव कराळे, संचालक संपतराव बेरड, तुषार बेरड, अविराज भांड, सुदाम गांधळे, मच्छिंद्र बेरड, दीपक लिपाणे, सर्वेश सपकाळ, मतीन ठाकरे, अभिजीत सपकाळ, अक्षय नागपुरे, रुमेश वराडे, बाळू शहापूरकर, दिपक धाडगे, मनोहर दरवडे, दिलीप ठोकळ, रविंद्र जाधव, शुभम मिसाळ, ऋतिक गारुडकर, गणेश शिंदे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अरुण जगताप म्हणाले की, शहराचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. मिंगार शहरानंतर नागरदेवळे देखील शहरालगत असून, मोठी लोकवस्ती वाढत आहे. वाढत्या शहरीकरणाबरोबरच आरोग्यसेवा देखील स्थानिक ठिकाणी मिळणे गरजेचे झाले आहे. या भागातील नागरिकांना औषधांसाठी शहरात येण्याची गरज न भासता, श्रीकृपा मेडिकलच्या माध्यमातून औषधे उपलब्ध होणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

संपतराव बेरड यांनी नागरदेवळे भागातील गरज ओळखून मेडिकल सुरु करण्यात आली आहे. नागरिकांना आरोग्यसुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनाने सेवा दिली जाणार असून, सर्व प्रकारचे औषधी उपलब्ध करुन दिले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

शारीरिक स्वास्थ्य कमवावे लागते, विकत, उसनवारीने मिळत नाही

डॉ. वंदना फाटके यांचे प्रतिपादन; महिलांसाठी स्वास्थ्य जागरुकता कार्यक्रमात व्यायाम, योगा व आहारावर मार्गदर्शन

नगर – शारीरिक स्वास्थ्य विकत अथवा उसनवारी मिळत नसून, ते कमवावे लागते. दररोज व्यायाम व योगाचा जीवनात समावेश केल्यास निरोगी व आनंदी जीवन जगता येणार आहे. भविष्यातील हॉस्पिटलचा खर्च व त्रास टाळण्यासाठी नियमित व्यायामासाठी घेतलेली काळजी व योग्य आहार शरीर स्वास्थ्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याची भावना डॉ. वंदना फाटके यांनी व्यक्त केली.

महिलांसाठी स्वास्थ्य जागरुकता कार्यक्रमात व्यायाम, योगा व आहारावर मार्गदर्शन करताना डॉ. वंदना फाटके. समवेत प्रयास ग्रुपच्या अलकाताई मुंदडा, दादी–नानी ग्रुपच्या जयाताई गायकवाड आदी.

सारसनगर येथील एम.एम.ए. मेंट्रिक्स जिम, टिम ५७, प्रयास ग्रुप व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी स्वास्थ्य जागरुकता कार्यक्रमातंर्गत मार्गदर्शन करताना डॉ. फाटके बोलत होत्या. यावेळी प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, दादी नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, योगिता पवते, गीता पवते, मनिषा पवते, एकता पवते, शांभवी जोशी, उपाध्यक्षा वंदना गारुडकर, उषा सोनी, सचिव सविता गांधी, जयश्री पुरोहित, विद्या बडवे, प्रयास ग्रुप सावेडी शाखेच्या अध्यक्षा कुसुमसिंग, अनिता काळे, मेघना मुनोत, ज्योत्सना कुलकर्णी, कविता दरंदळे, शकुंतला जाधव, उज्वला बोगावत, राखी जाधव, ज्योती गांधी, मायाताई कोल्हे, वंदना गोसावी, राजश्री पोहेकर, अंजली गायकवाड, लता कांबळे, शोभा भालसिंग, शशिकला झरेकर, शोभा कानडे, आशा गायकवाड, निलीमा पवार, रजनी भंडारी, कालिदास पवते, सचिन पवते, राज पवते, स्वप्निल पवते, सचिन काळभोर, प्रशांत काळभोर, सुमित पवते, ऋषी पवते, योगेश मोहडीकर, किरण बगळे आदी उपस्थित होते.

शांभवी जोशी म्हणाल्या की, योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते. जिम आणि व्यायाम फक्त पुरुषांसाठी नसून, महिलांनी देखील याकडे वळले पाहिजे. सध्याच्या युवतींमध्ये व्यायामाची आवड निर्माण होत असून, व्यायाम फक्त सुंदर सुडौल शरीरासाठी नव्हे, तर शारीरिक स्वास्थ्यासाठी उपयुक्त आहे. व्यायामाने भविष्यातील व्याधी व आजार देखील टळतात व जीवन देखील आनंदी बनत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वास्थ्य जागरुकता कार्यक्रमासाठी परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एम.एम.ए. मेंट्रिक्स जिम मध्ये महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने विशेष लक्ष दिले जात असून, योगा, झुम्बा आदींसह एमएमए सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

विविध मागण्यांसंदर्भात तांत्रिक कामगार युनियनचे मुंबईतील 'बेमुदत धरणे आंदोलन' ऊर्जा उपसचिवांशी चर्चेनंतर स्थगित

नगर – तांत्रिक कामगार युनियनच्यावतीने प्रलंबित असलेल्या प्रश्न व मागण्यांकरिता आझाद मैदान मुंबई येथे २ जुलैपासून बेमुदत धरणे आंदोलन पुकारले होते. आंदोलनाची दखल घेत आज शासनातर्फे ऊर्जा उपसचिव श्री. बडगिरे व केंद्रीय पदाधिकारी शिष्टमंडळ यांचे समवेत सकारात्मक चर्चा झाली. या चर्चानुसार तांत्रिक कामगार युनियन ५०५९ चे सुरू असलेले आंदोलन तूर्त स्थगित करण्यात येत असल्याची माहिती तांत्रिक कामगार युनियनचे केंद्रीय सरचिटणीस प्रभाकर लहाने यांनी दिली.

आंदोलनामध्ये तांत्रिक कामगार युयिनयनचे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे, उपाध्यक्ष बी. आर. पवार, सतिश भुजबळ (नगर), गोपाल गाडगे, सरचिटणीस प्रभाकर लहाने, उपसरचिटणीस नितीन चव्हाण, शिवाजी शिवणेघारी, संजय उगले, राज्य संघटक महेश हिवराळे, आर. आर. ठाकुर, राज्य सचिव आनंद जगताप, रघुनाथ लाड (नगर), प्रकाश निकम, कोषाध्यक्ष गजानन अघम, मुख्य कार्यालय प्रतिनीधी पारेषण विक्रम चव्हाण, दत्तु भोईर (नगर), किरण कन्हाळे,

तांत्रिक कामगार युनियनच्यावतीने प्रलंबित असलेल्या प्रश्न व मागण्यांकरिता आझाद मैदान मुंबई येथे २ जुलैपासून धरणे आंदोलन पुकारले असून नगरमधील असंख्य कामगार यात सहभागी झाले आहेत. शासनातर्फे ऊर्जा उपसचिव श्री. बडगिरे व केंद्रीय पदाधिकारी शिष्टमंडळ यांचे समवेत सकारात्मक चर्चानुसार हे आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले.

प्रकाश वाघ, सुनिल सोनवणे, उपसंपादक विवेक बोरकर, प्रसिध्दी प्रमुख अनिल सरोद (नगर), विक्की कावळे यांच्या सह अहमदनगर मधील शंकर जाडकर, विक्रम कोके, बाळासाहेब जावळे, सचिन सुडके, शरद काकडे, शेकडो तांत्रिक कामगार उपस्थित होते. प्रश्न सुटेपर्यंत अविरत आंदोलनाचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला होता.

तांत्रिक कामगारांच्या मागण्या व प्रश्ना बाबत महावितरण प्रशासन उदासिन असल्याने प्रशासना प्रति तांत्रिक कामगारांनी २४ ऑगष्ट २०२२ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे व २२ डिसेंबर २०२२ रोजी विधानभवनावर, नागपुर येथे आकोश व्यक्त केला आहे. तसेच मुख्य कार्यालय, प्रकाशगड येथे तिव्या आंदोलनाची नोटीस सुध्दा देण्यात आली होती. तरी सुध्दा दिलेल्या आश्वासनानुसार प्रशासन कामगारांचे प्रश्न सोडवित नसल्याने तांत्रिक कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

यापूर्वी आंदोलनाच्या पाश्वभुमिवर संचालक मानव संसाधन यांच्या समवेत सविस्तर चर्चा करण्यात आली होती, चर्चेमध्ये संघटनेने सादर केलेले सर्व प्रश्न हे योग्य असल्याचे मानव संसाधन संचालक यांनी मान्य केले. तसेच सदरहु प्रश्न तातडीने कार्यवाही करण्याच्या सुचना देणार असल्याचे कळविले होते तसेच प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाने लेखी आश्वासन दिले होते. परंतु कंपनी प्रशासनाकडून महत्वाचे प्रलंबित व ज्वलंत प्रश्नाबाबत कार्यवाही अपेक्षीत असतांना धोरणात्मक निर्णय असल्याचे लेखी कळविले जाते. संघटनेला व कामगारांना हे अपेक्षित नाही. व्यवस्थापनाचे धोरण हे कामगार व ग्राहकांना न्याय देणारे असावेत. अन्यायकारक व कामगार विरोधी व्यवस्थापनाचे धोरण असल्याने तांत्रिक कामगारांचा रोष वाढत आहे. दिलेले आश्वासन त्वरीत पुर्ण करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली होती.

होमिओपॅथिक कॉलेजतर्फे ८ जुलैपासून नगरमध्ये 'मेंदू व थायरॉईडवर शिबीर'

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, नगर येथे ८ ते १३ जुलै पर्यंत सकाळी ९.३० ते १.०० या वेळेत मेंदुविकार व थॉयराईड विकार या विकारांवर मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली.

या शिबीरामध्ये, मेंदुविकर व थॉयराईड विकार या आजारावर सखोल चिकित्सा करन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत होमिओपॅथिक औषधे दिली जातील.

सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार डॉ. सुनिल पवार, डॉ. वाकळे राजेंद्र, डॉ. वारे सोनाली, डॉ. मोरे माधुरी हे करणार असुन आजार बरा होईपर्यंत सर्वांना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करन या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल.

तरी अहमदनगर व अहमदनगर परिसरातील सर्व गरजु व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेड, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक श्री. बोरा आर. एस., अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण, कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ. डॉ. मोरे माधुरी यांनी केले आहे.

तीन आरोपींची शिक्षा अपिलामध्ये रद्द

नगर – शिक्षक कॉलनी पाथर्डी येथे १०/०६/२०१० फिर्यादी रमेश असराजी घुले यांनी आरोपी गणेश कुंडलिक जाधव, रविंद्र कुंडलिक जाधव, रामा कुंडलिक जाधव सर्व रा.शिक्षक कॉलनी, पाथर्डी यांना तुम्ही रस्त्यात उभे राहू नका, असे म्हणाला. त्याचा राग येऊन वरील सर्व आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचे घरात अनाधिकाराने प्रवेश करुन फिर्यादी व त्याचे पत्नीस घाण–घाण शिवीगाळ करुन, समदाटी करुन तसेच आरोपी क्र.३ याने त्याचे हातातील गजाने फिर्यादीस मारहाण करुन त्याचे नाकाचे हाड फ्रॅक्चर केले. तसेच शरीरावर इतर भागावर मारहाण केली. तसेच आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादी व त्याची पत्नी यांना लाथा–बुक्यांनी मारहाण करुन घरच्या खिडकीच्या काचा, कपाटाच्या व शोकेसच्या काचा फोडून तसेच मोबाईल व लँडलाईन फोन फोडून फिर्यादीचे नुकसान केले म्हणून पाथर्डी पोलिसांनी वरील सर्व आरोपींचे विरोधात भा.द.वि.कलम ४५२, ३२५, ३२४, ४२७, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असता त्याची पाथर्डी येथील प्रथम न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात चौकशी होवून त्यात वरील सर्व आरोपींना कलम ३२४, ३२३, ४५२ सह ३४ अन्वये १८/४/२०१५ रोजी दोषी धरुन ६ महिने शिक्षा व समळ्या आरोपींना सर्व कलमांन्वये एकंदरीत रुपये २७,००० दंड ठोठावण्यात आला होता.

सदरचे शिक्षेविरोधात आरोपी यांनी थेथील जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले असता त्याची सुनावणी थेथील जिल्हा न्यायालयात होवून सर्व शिक्षा रद्द करण्यात येवून रुपये २७,००० एकंदरीत दंड देखील रद्द करन सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येऊन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचा निकाल रद्द करण्यात आला. अपिलाचे कामी थेथील जिल्हा न्यायालयात ॲड.सतिशचंद्र सुद्रिक यांनी काम पाहिले.

आर सी सी कामात रेनफोर्समेंट डीटेलिंग अत्यंत महत्वाचे

इंजि. उदित हिरे यांचे प्रतिपादन; आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲंड सर्व्हेअर्स असो.च्या वतीने रेनफोर्समेंट डिटेलिंग इन.आर.सी.सी स्ट्रक्चर यावर व्याख्यान

नगर – आर सी सी कामात स्टीलचा वापर कश्या पद्धतीने करावा हा अत्यंत महत्वाचा घटक असून जास्त स्टीलचा वापर केला म्हणजे आपली इमारत भक्कम होते असा नसून योग्य जागी योग्य पद्धतीने स्टीलचा वापर करणे आवश्यक असते. हे करत असताना आर सी सी डिझायनर आय एस कोड चा वापर करतात तसेच त्याचे प्लॅन मध्ये योग्य प्रकारे डिटेल्स दिले की साइटवर इंजिनिअर्स यांना काम करणे सोपे जाते. अश्या कामांची काप्स्टिंग आधी डिझायनर कडून तपासणी करणे आणि प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन इंजि. उदित हिरे यांनी केले.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲंड सर्व्हेअर्स असोसिएशनतर्फे आयोजित इंजि. उदित हिरे यांच्या व्याख्यानप्रसंगी त्यांचा सत्कार करताना अध्यक्ष रमेश कालें. समवेत उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे व इतर पदाधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात असोसिएशनचे सभासद. (छाया – लहू दळवी)

आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲंड सर्व्हेअर्स असो. अहमदनगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यामने एस्ना नॉलेज सीरिज अंतर्गत हिरे कन्सल्टिंग इंजिनीअर्सचे संचालक इंजि. उदित हिरे यांचे रेनफोर्समेंट डीटेलिंग इन आर सी सी स्ट्रक्चर या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यात त्यांनी कॉलम, बिम आणि स्लॅब डीटेलिंग, क्रॅंक बिम व स्टेअरकेस डीटेलिंग, मूक्पंप रोधक डिझाईन, बहुमजली इमारती साठी डीटेलिंग याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे, वैशाखी हिरे, वर्षा कुसळकर, अजिंक्य बालटे, दादा बेरड, रवी माने, एस यू खान, अजिंक्य बालटे, प्रितेश पाटोळे, राजकुमार मुनोत, संतोष गादिया, अनिकेत राठळ, दीपक मुथा, अनमोल जैन, योगेश परदेशी, सतीश कांबळे, नागेश खुरपे, संभा वाघ, सचिन पवार, रवींद्र खर्डे, प्रशांत आढाव आणि सभासद उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष रमेश कालें म्हणाले की, नॉलेज सीरिज माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास सभासदांना मार्गदर्शन मिळते आणि या व्यासपीठाच्या माध्यमातून नवीन सभासदांना त्यांचे विचार आणि ज्ञानाचा प्रसार समाजामध्ये करण्यास चालना मिळते. उदित हिरे हे उच्च शिक्षित इंजिनिअर असून त्यांचे हाय राईज व लो राईज बिल्डिंगचे आर सी सी डिझाईन, स्टील शेड डिझाइन, वॉटर टॅंक डिझाइन, जिओ टेक्निकल सर्व्हिसेस, स्ट्रक्चरल ऑडिट अश्या विविध सेवा त्यांच्या हिरे कन्सल्टिंग इंजिनीअर्स अंतर्गत अहमदनगर आणि मालेगाव मध्ये ते देतात. असे सांगितले.

पोलाद स्टीलचे यश दायमा यांनी उदित हिरे यांनी दिलेली माहिती संकलित करून ती सॉफ्ट कॉपी फॉरमॅट मध्ये आपल्याकडे जतन केल्यास फील्ड वर काम करताना त्याचा नक्कीच उपयोग होऊ शकेल असे सांगून या उपक्रमाअंतर्गत वेगवेगळे तांत्रिक विषय चर्चेत आल्याने त्याचा उपयोग सभासद त्यांच्या कामात करून घेतील असे नमूद केले.

यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष अविनाश कुलकर्णी यांचा ब्रेन स्टॉर्मिंग थॉट्स ही सिव्हील इंजिनिअरिंग क्षेत्रातील विषयावर उपयुक्त लेखमाला लिहिल्याबद्दल इंजि. विवेक आपटे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

संचालक यश शहा यांनी वक्ते हिरे यांचा परिचय करून दिला तर सचिव प्रदिप तांदळे यांनी सूत्रसंचालन केले आणि उपस्थितांचे आभार मानले.

सुरांच्या माध्यमातून शब्दांना सौंदर्य देणारा गायक मोहंमद रफी

राजकुमार गुरनानी यांचे प्रतिपादन; आदमी मुसाफिर है' अशा गीतांनी मोहंमद रफी यांना अभिवादन

नगर – शब्द हे फार काही करु शकते. कवींनी लिहिलेल्या गीतांमुळे माणसाला आकाशात असल्याचे भासवून जाऊ शकते. तर त्याच शब्दांनी माणसाची चिचांकी ही होते. अशाच या कवींनी लिहिलेल्या गीतांना जोपर्यंत सुरांची साथ मिळत नाही तो पर्यंत ते रसिकांना आवडत नाही. या कार्यात सुरांच्या माध्यमातून शब्दांना सौंदर्य देण्यात मोहंमद रफी यांचा हातखंडा होता, असे प्रतिपादन संगीतप्रेमी व स्वरछंद ग्रुपचे राजकुमार गुरनानी यांनी केले.

स्व. गायक मोहंमद रफी यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'आदमी मुसाफिर है'चे रावसाहेब पटवर्धन स्मारकात आयोजन कार्यक्रमप्रसंगी राजकुमार गुरनानी, श्रीहरी तीपुगडे, पवन नाईक आदी.

गाता रहे मेरा दिल ग्रुप व स्वरछंद ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने स्व.मोहंमद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त 'आदमी मुसाफिर है'चे रावसाहेब पटवर्धन स्मागृहात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री. गुरनानी बोलत होते. प्रमुख पाहुणे सिद्धी फोर्सचे संचालक श्रीहरी तीपुगडे, सुफी गायक पवन नाईक, राजकुमार गुरनानी, अमित धारणी, दिपा माळी आदि मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मोहंमद रफी यांना अभिवादन करण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना श्रीहरी तीपुगडे म्हणाले की, आजच्या या धकाधकीच्या जीवनात थोर गीतकारांच्या जयंती व पुण्यतिथीच्या माध्यमातून होणाऱ्या या गायनाच्या कार्यक्रमातून नवीन कलाकारांना संधी प्राप्त होत आहे. अशाच कार्यक्रमांद्वारे छोटे कलाकार टी.व्ही. व सिनेमात सुद्धा पोहचत असून, कलाकारांना रोजगार प्राप्त होत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात... बेखुदी में सनम उठ गये जो कदम.. कोयल बोली दुनिया डोली.. कितना प्यार वादा.. वादा करने साजना.. तुम्हारी नजर क्यु खफा हो गई... आदमी मुसाफिर है.. आज कल तेरे मेरे चर्चे.. आजा तुझको पुकारे मेरा प्यार.. रिमझिम के गीत सावन गाये.. अश्या सुरेल व एव्हर ग्रीन गाणी सुनील भंडारी, प्रा.दिपा भालेराव, निता गडाख, हेमंत नरसाळे, सुनील हळगावकर, पुनम कदम, प्रशांत दरे, वंदना जंगम, ॲड. अमिन धारानी, गुलशन धारांनी, राजकुमार सहदेव, माधुरी सोनटक्के, चारू रसाने, महेश घावटे, रोशित सुखधन, डॉ.गायत्री कुलकर्णी, डॉ.दमण काशीद, जयश्री साळवे, चंदर ललवाणी, सुनीता धमाधिकारी, आबीद खान आदींनी ब्लॅक ॲण्ड व्हाईट काळातील व कलर सिनेमाच्या काळातील मोहम्मद रफी यांचे सदाबहार अशा द्रीगीत सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध करून त्यांची वाहवा वाही व भरपूर दाद मिळविली.

सूत्रसंचालन दिपा माळी यांनी मोहम्मद रफी यांच्या जीवनाचा प्रत्येक पहलु थोडा थोडा परिचय करुन देत उत्तम रित्या केले. आभार ॲड. गुलशन धारणी यांनी मानले. कार्यक्रमास मोहंमद रफी यांचे गीतप्रेमी व संगीतप्रेमी उपस्थित होते.

दासू वैद्य यांच्या हस्ते 'अल्फ़ाज़– कुछ कहे.. कुछ अनकहे..' हिंदी काव्य संग्रहाचा ६ जुलै रोजी नगरमध्ये प्रकाशन सोहळा

नगर – सुदर्शन कुलकर्णी लिखित 'अल्फ़ाज़– कुछ कहे.. कुछ अनकहे..' या हिंदी काव्य संग्रहाचा प्रकाशन सोहळा ६ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता पेमराज सारडा येथे होणार असल्याचे पुणे येथील संस्कृती प्रकाशन संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

ज्येष्ठ लेखक, कवि, गीतकार दासु वैद्य यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होणार असून महाराष्ट्र साहित्य परिषद सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमास आ. संग्राम जगताप, म.सा.प. पुणे च्या प्रमुख कार्यवाह सुनीता राजे पवार, महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलूलकर, आणि आय.एस.एम.टी– किर्लोस्कर फेरस लिमिटेड कंपनीचे सरव्यवस्थापक चैतन्य शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे अशी माहित 'अल्फ़ाज़' काव्यसंग्रह स्वर्गीय हरिवंशराय बच्चन यांच्या मधूशाला या काव्यसंग्रहास समर्पित असून हिंदीतील रुबाईनुसा या काव्य प्रकारातील लेखन करतांना सुदर्शन कुलकर्णी यांनी मनातील भावना आणि विचार प्रतिबिंबीत केले आहेत.

या सोहळ्यात नगरकर साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे असे असे आवाहन मसाप, सावेडी शाखा, अ.भा.नाट्यपरिषद उपनगर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे



कर सल्लागार आनंद लहामगे यांची उत्तर महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या जॉइंट सेक्रेटरीपदी निवड झाल्याबद्दल आ. संग्राम जगताप यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी सुरेश बनसोडे, मधुर बांगरे, पप्पु पाटील, विकी तिवारी, विशाल म्हस्के, ऋतिक लद्दे आदी उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

'डायबेटिक फूट'वर प्रभावी एलिझारोव्ह तंत्रज्ञान

संपूर्ण जगभरामध्ये जीवनशैलीमुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. यामध्ये मधुमेहाच्या व्याधीने ग्रस्त असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सद्यस्थितीत भारतामध्ये १० कोटींहून अधिक मधुमेहाचे रुग्ण आहेत. २०१९ मध्ये ही संख्या सात कोटी होती. म्हणजेच, केवळ चार वर्षांत सुमारे ४ कोटी भारतीयांना मधुमेहाची लागण झाली असल्याची माहिती इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च म्हणजेच आयसीएआरच्या गतवर्षीच्या अहवालातून समोर आली होती. चार वर्षांत ४४ टक्क्यांनी मधुमेहीची संख्या वाढणे ही अर्थातच अत्यंत चिंताजनक बाब आहे. याचे कारण शरीराच्या विविध अवयवांवर मधुमेहाचे अत्यंत प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते.

डोळे, यकृत, मूत्रपिंड याबरोबरच पायांसाठीही मधुमेह हा काळजी वाढवणारा ठरतो. वैद्यकीय परिभाषेत याला 'डायबेटिक फूट' असे म्हटले जाते. याविषयी अनेकांना माहिती नसते. कारण सुरुवातीला याची लक्षणे दिसत असली तरी त्याचे रुग्णाला आकलनच होत नाही. पायांना असाधारण सूज येणे, जळजळ होणे, लालसरपणा जाणवणे, त्वचेचा रंग बदलणे, पाय सुन्न होणे आणि मुंग्या येणे, चालताना वेदना होणे, फोड येणे अशी या याचीमध्ये दिसू शकतात. मुळात मधुमेही व्यक्तींमध्ये स्वतवाहिन्या कडक आणि अरुंद होतात. रक्तशर्करेची पातळी दीर्घकाळ वाढलेलीच राहिली की ही अरुंदीकरणाची प्रक्रिया अधिक प्रमाणात होते. याचा परिणाम हृदयाकडून शरीराताील अन्य अवयवांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यावर होतो आणि तो कमी होत जातो. रक्तावरोबरच या अवयवांना ऑक्सिजनचा पुरवठाही कमी होतो. यामुळे संवेदना कमी होत जातात. विशेषतः हृदयाप्रमाणे लांब असणाऱ्या तळपायाबाबत ही स्थिती अधिक धोकादायक ठरते. कारण अशा स्थितीत पोहोचलेल्या रुग्णांना तळपायाला टोचलेले, लागलेले, खरचटलेले समजतच नाही.

केअरटेकरच्या किंवा कुटुंबातील कुणाच्या लक्षात आले तर तात्काळ योग्य उपचार करून ही जखम नियंत्रणात आणण्यासाठी उपचार केले जातात. अन्यथा बहुतांश जणांबाबत ही जखम चिघळत जाऊन हाडांपर्यंत संसर्ग पोहोचतो. पुढे जाऊन हाड निकामी होतात. वैद्यकीय शब्दांमध्ये याला गँगरीन म्हटले जाते. गँगरीनची स्थिती ही रुग्णासाठी अत्यंत घातक असते. कारण यामध्ये पायाला झालेली जखम बरी होण्याची शक्यताच मावळून जाते. अशा वेळी पाय कापून टाकण्याशिवाय पर्याय उरत नाही. विशेषतः वयोवृद्ध मधुमेही रुग्णांमध्ये हे प्रकार अधिक प्रमाणात दिसतात. पाय कापून टाकणे हा त्यांच्यासाठी मानसिक आघात असतो. कारण आधीच या वयात आलेल्या परावलंबित्वामुळे त्यांची मानसिक कुतरओढ होत असते. तशातच आयुष्यभर ज्या पायांच्या साहाय्यानं धावत-पळत-चालत आपलं आपल्याला जगता येत होतं, तो पायच शरीरापासून वेगळा केल्याचा धक्का त्यांना सहन होत नाही.

गेल्या काही वर्षांमध्ये एलिझारोव्ह या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पाय कापण्याची आपत्ती टाळता येणे शक्य झाले आहे.

नवं तंत्रज्ञान

एलिझारोव्ह हे प्रामुख्याने रशियन तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तुलनेने कमी खर्च येण्याबरोबरच या शस्त्रक्रियेद्वारे उपचार केलेला रुग्ण कही तासांमध्ये रुग्णालयातून घरी जाऊ शकतो आणि अगदी कही दिवसांतच तो पूर्ववत चालतं-फिरतं आयुष्य जगू शकतो. ही बाब त्या रुग्णाला मनोबल देणारी आणि त्याचा आत्मविश्वास, धारीविरुद्ध लढण्याची इच्छाशक्ती वाढवण्यामध्ये सकारात्मक भूमिका बजावती. त्सेचे रुग्ण लवकर चालू लागल्यामुळे शरीरात ऑक्सिजन व रक्तपुरवठा वाढतो. बरसनक्रिया, पचनक्रिया व मुत्रशयाची क्रिया चांगल्याप्रकारे काम करु लागतात. यामुळे सामान्य स्थितीत शस्त्रक्रियेनंतर दिसणाऱ्या बद्धकोष्ठता, लघवीच्या समस्या, फुफ्फुसाच्या समस्या, कातडीवर जखमा होणे अशी समस्या टाळता येतात. अन्यथा शस्त्रक्रियेनंतर दीर्घकाळ अंथरुणाला खिळून राहिल्यास रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती कमी होणे, जंतूसंसर्ग होणे, रक्ताच्या गुठळ्या होणे अशा अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. एलिझारोव्ह तंत्रज्ञानाद्वारे केलेल्या शस्त्रक्रियेमुळे रुग्ण आपली नित्याची कामे काही दिवसांतच करु लागल्यामुळे स्वावलंबी बनतो.

रशियन एलिझारोव्ह हे जगातील सर्व अस्थिरोगांवरील अतिप्रगत तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते. याद्वारे होणाऱ्या शस्त्रक्रियेत शरीराच्या बाहेरूनच धातीचे तार व रिंगांची फ्रेम बसवून उपचार केला जातो. ही फ्रेम अत्यंत मजबूत असल्याने शरीराचे संपूर्ण वजन घेऊन रुग्ण चालू शकतात.

केवळ मधुमेहींसाठीच नव्हे तर पोलिओग्रस्त मुलांसाठीही हे तंत्रज्ञान वरदान ठरले आहे. पोलिओग्रस्त मुलांमध्ये गुडघ्याजवळच्या स्नायूंचे आकुंचन होते. पायांचे पंजे आणि गुडघा या दोन्हींमध्ये दोष निर्माण झाल्यामुळे स्वतःच्या पायावर चालून जग बघण्याचं या मुलांचं स्वप्न धुळीस मिळलं. पूर्वी यावर उपचारच नसल्याने हजारो जणांनी आपल्या वाट्याला आलेले भोग म्हणत पोलिओग्रस्त पायांच्या साहाय्यानं आयुष्य पुढे ढकललं. पण वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे अस्थिव्यंगशास्त्राही आधुनिक उपचार, नवं तंत्रज्ञान विकसित झाले. रशियन एलिझारोव्ह तंत्रामुळे स्नायू आणि हाडांमधील ताकद वाढून अशा मुलांचे गुडघे सरळ करणे शक्य झाले आहे. त्यामुळे पोलिओग्रस्तांसाठी हे तंत्रज्ञान संजीवनी ठरत आहे.

तात्पर्य, पोलिओग्रस्त असोत किंवा गँगरीनमुळे पाय कापण्याची वेळ आलेले मधुमेही असोत किंवा अस्थिव्यंगाच्या समस्येने ग्रस्त रुग्ण असोत या सर्वांनी हताश होण्याची, निराश होण्याची आवश्यकता नाही. तेही या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पूर्ववत आयुष्य जगू शकतात. अर्थातच पथ्यपाणी सांभाळून आणि योग्य ती काळजी घेऊन !

– डॉ. सुहास शहा,
ऑर्थोपेडिकतज्ज्ञ (लेखक रशियन सर्जरीतील तज्ज्ञ आहेत.)

◆◆◆

सर्वांत मोठे तळे

मित्रांनो, तुम्ही गावांमध्ये, खेड्यांमध्ये पाण्याने भरलेली अनेक तळी पाहिली असतील. केवळ शेतीसाठी अथवा माणसांसाठीच नव्हे तर पशू-पक्ष्यांसाठीही अशी तळी ही वरदानच असतात. जंगलांमध्ये असणाऱ्या तलावांमध्ये अनेक कच्चाणी आपली तहान भागवण्यासाठी येत असतात. असो, मित्रांनो तुम्हाला जगातील सर्वांत मोठे तळे कोठे आहे माहीत आहे का? नाही ना? उत्तर अमेरिकेत 'सुपिरिअर' नावाचे तळे हे जगातील सर्वांत मोठे तळे मानले जाते. याचा आकार ८२,३५० चौरस किलोमीटर एवढा आहे.

ऑस्ट्रिया या देशाव्यतिरिक्त हे तळे आहे. दक्षिण अमेरिकेतील 'टिटीकॅका' या तळ्याची खोली जगात सर्वाधिक असल्याचे सांगितले जाते. या तळ्याची खोली ३८,०१० मीटर एवढी आहे. जगातील अनेक तळ्यांची निर्मिती प्राचीन काळात झाली आहे. अनेक तळ्यांची निर्मिती बर्फ वितळल्यामुळे झाल्याचे सांगितले जाते. काही तळी ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे निर्माण झाल्याचे सांगितले जाते.

◆◆◆



आर्क्टिक महासागर बर्फहीन होणार?

जागतिक तापमानवाढीचा सर्वाधिक परिणाम ध्रुवीय प्रदेशांवर विशेषत: उत्तर ध्रुव म्हणजेच आर्क्टिक प्रदेशावर दिसून येत आहे. आता एका नवीन संशोधनात असे आढळले की आर्क्टिक महासागरातील बर्फ २०३० पर्यंत पूर्णपणे नाहीसा होऊ शकतो, याचा अर्थ २०३० पर्यंत या महासागरात उन्हाळ्यात बर्फ दिसणार नाही. 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. १९७९ ते १०१९ पर्यंतचा डेटा, उपग्रह प्रतिमा आणि हवामान मॉडिल्सचे विश्लेषण करून असे सांगण्यात आले की आर्क्टिक प्रदेशातील बर्फ अंदाजापेक्षा वेगाने वितळत आहे. २०२१ मध्ये, युनोच्या पर्यावरण पॅनेलने सांगितले की शतकाच्या मध्यापर्यंत आर्क्टिक बर्फनुन्न होईल. अशी परिस्थिती अवघ्या दहा वर्षांत होईल. आर्क्टिकचे तापमान इतर जगाच्या चारपट वेगाने वाढत आहे. गेल्या ४० वर्षांत, उन्हाळ्यानंतर राहिलेला बहुस्तरीय बर्फ ७० लाख चौरस कि.मी. वरून ४० लाख चौरस कि.मी. इतका कमी झाला आहे. जो भारताच्या क्षेत्रफळाइतका आहे.

या वेगाने वितळत असलेल्या बर्फामुळे महासागर तील जलस्तर वाढेल, सागरी प्रवाह, मान्सून प्रभावित होईल जागतिक समुद्राची पातळी सध्या दरवर्षी ४.५ मि.मी.ने वाढत आहे, जी बर्फ वितळल्याने आणखी वेगाने वाढेल. आर्क्टिकवर पडणारे बहुतेक किरण बर्फाने परावर्तित होऊन आकाशात परत जातात. बर्फ नसल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढेल. सागरी प्रवाह, मान्सून, चक्रीवादळ आणि जलचर वनस्पती आणि जीवजंतू प्रभावित होतील. आर्क्टिक बर्फ समाप्तीमुळे उष्णतेच्या लाटा, जंगलातील आग, पूर यासह अत्यंत हवामानाच्या घटनांमध्ये वाढ होईल.

◆◆◆

'एआय'करणार वकिली!

ओपन एआय'चे 'चॅटजीपीटी', मायक्रोसॉफ्टचे 'बिंग' आणि 'गुगल'च्या 'बार्ड'सारख्या चॅटबोटस्च्या धर्तीवर आता कायद्याच्या क्षेत्रातील 'लिगल जीपीटी'बनवण्याची तयारी आपल्याच देशात सुरू आहे. इंटलेक्चुअल प्रॉपर्टी आणि टेक्नॉलॉजी लॉमध्ये याचवर्षी 'एलएलएम'केलेल्या चेझईच्या कपिल नरेश यांनी आता हे आणखी एका प्रकारचे 'एलएलएम'करण्याची तयारी केली आहे. हे 'एलएलएम'म्हणजे 'लार्ज लॅंग्वेज मॉडेल'. हे एक प्रकारचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स आहे जे चॅटबोटस्सारखेच असेल.

२३ वर्षांचे नरेश हे एका कायदेशीर सहाय्यार फर्मचे संस्थापकही आहेत. आता ते 'चॅटजीपीटी'च्या धर्तीवर 'लिगल जीपीटी' बनवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. हा एक असा प्लॅटफॉर्म असेल जो आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून वेक्स रिसर्चपासून एफआयआर, चार्जशीट ड्राफ्ट करण्यासाठी तसेच कोर्टातील युक्तिवाद बनवण्यासाठीचे काम करील. एखादा दिग्गज वकील जे करील ते सर्व हे 'लिगल जीपीटी'करू शकेल.

नरेश यांनी सांगितले की सध्या 'लिगल जीपीटी'हे केवळ पहिल्या वर्षात शिकणाऱ्या कायद्याच्या विद्यार्थ्यासारखेच आहे. त्याला आणखी तयार केले तर ते माझ्यासारख्या नवख्या वकिलाइतके काम करू शकेल. मी 'लिगल जीपीटी'ला इतके मजबूत बनवू इच्छितो जे सर्वांच्या न्यायालयातील नामांकित वकिलांसारखे काम करू शकेल.

◆◆◆

आठळला हिटलरचा सोन्याचा खजिना!

पोलंडमध्ये खजिना शोधणाऱ्या एका पथकाला ॲडॉल्फ हिटलरचे असे रहस्य सापडले, ज्याही आजवर कोणालाच कल्पना नव्हती. दुसऱ्या युद्धादरम्यान, नाजी सेनेशी संबंधित एका बंकरमध्ये हा खजिना हाती लागला असून, याची चोरी हिटलरने केली होती, असे मानले जाते.

मामेरकी बंकरमध्ये खोदकाम करत असताना हा सोन्याचा खजिना मिळाला. आश्चर्याची बाब म्हणजे, रेल्वे ट्रॅकच्या खाली ५ फूट खोलवर हा खजिना लपवण्यात आला होता. जॅक्रिज हिस्टोरिकल ॲंड एक्सप्लोरेटरी असोसिएशनने हा दुर्मिळ शोध लावला.

असोसिएशनचे एक पथक पोलंडमधील मामेरकी बंदरात खोदाई करत असताना या खजिन्याचा सुगावा लागला. ब्रिटिश माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, हिटलरने युद्धादरम्यान चोरलेला खजिना रेल्वेच्या ट्रॅकखाली लपवला होता. या पथकाने वार्मिया आणि माजुरी प्रांतात जमिनीच्या खाली पाच फूट खोदले असून, ही जागा हिटलरच्या बंकरपासून काही मैल अंतरावर जर्मन सेना कमांड हेडक्वॉर्टर स्थित आहे. मामेरकी संग्हालयाचे प्लेबस्की यांनी सोशल मीडियावर या नव्या शोधासंदर्भात माहिती दिली.

◆◆◆



भारतीयांचं गायनप्रेम

संगीत ही केवळ एक कला नसून, त्यापलीकडेही काही तरी त्यामध्ये निश्चितच आहे. भारतात गाद्धाद्याची उपरसा प्राचीन काळापासूनच होत आलेली आहे. खरे तर भारतीय अभिजात संगीताचा उगमच सामवेदापासून झालेला आहे. अर्थातच, भारतीयांना संगीत केलेची आवाड प्राचीन काळापासूनच आहे. आजही संगीत, गाणी ऐकणारे अनेक लोक आपल्या देशात पहायला मिळतील. जगाचा विचार केला तर अन्य देशातील लोकांच्या तुलनेत भारतीय लोक सरासरी पाच तास अधिक गाणी ऐकतात, असे एका नव्या पाहणीतून दिसून आले आहे. आपण भारतीय लोक हृद आठवड्याला सरासरी २५.७ तास गाणी ऐकतो. जगातील ही सरासरी वीस तासांची आहे. याचा अर्थ जगाच्या तुलनेत आपण दर आठवड्याला पाच तास अधिक वेळ गाणी ऐकण्यासाठी देत असतो. देशातील ६३ टक्के आणि जगातील ६९ टक्के लोक मानतात की, गाणी ऐकल्याने मानसिक आरोग्य चांगले राहते.

७० टक्के लोकांनी म्हटले आहे की, ते व्यायाम करीत असताना गाणी ऐकतात. त्यापैकी ८८ टक्के लोक रनिंगवेळी, ८३ टक्के लोक योगासने करीत असताना आणि ७३ टक्के लोक सायकलिंग करीत असताना गाणी ऐकतात. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फोनोग्राफिक इंडस्ट्रीने भारत-चीनसह २२ देशांमधील ३४ हजार लोकांची पाहणी करून 'ऐगेजिंग विथ म्युझिक' नावाचा हा रिपोर्ट बनवला आहे. त्यानुसार २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये जगातील म्युझिक इंडस्ट्री ८ टक्के आणि भारताची १३ टक्क्यांनी वाढू शकते.

◆◆◆

धूम रिऑलिटी हेडसेटची

अ‍ॅपल कंपन्या अद्ययावत अशी उपकरणे बनवत आहेत. ॲपल डब्ल्यूडब्ल्यूडीसी कंपनीने आपला पहिला मिक्स्ड रिऑलिटी हेडसेट लॉंच केला. याला 'ॲपल व्हिजन प्रो'असे नाव देण्यात आले आहे. हा हेडसेट डोक्याला घातल्यावर आणि डोळ्यांवर घातल्यावर वापरकर्त्यांसमोर एक स्क्रीन सादर करतो. ज्याभोवू प्रत्येक लहान-मोठे काम केले जाते. मनोरंजन ते गेमिंगपर्यंत यामध्ये चांगला अनुभव मिळतो. 'व्हिजन प्रो'ला डोळे आणि

आवाजाने नियंत्रित केले जाऊ शकते असे कंपनीचे म्हणणे आहे.

याबाबतचे वृत्त 'गॅजेटस् ३६०'ने दिले आहे. 'ॲपल'ने जेव्हा 'व्हिजन प्रो'ची घोषणा ऐकली तेव्हा तिथे उपस्थित असणाऱ्या माध्यमांना कंपनीने आश्चर्यचकित केले. यामधले 'अयसाईट'हे एक असे फिचर आहे जे कोणी हे व्हिजन प्रो डोळ्यांवर हेडसेट घालते, तेव्हा ज्याने कोणी ते घातले आहे त्याच्यासह खोलीमध्ये कोणी आहे का शोध्यासाठी डिव्हाईसच्या चारही बाजूंनी कॅमेरा सेन्सरचा वापर करते. 'व्हिजन प्रो'मध्ये अनेक फिचर्स आहेत.

दृश्य स्पष्टपणे दिसण्यासाठी मायक्रो 'ओएलईडी' डिस्प्ले, पॉवरसाठी एन २ चिप आणि हाताचे इशारे आणि नियंत्रणासाठी आवाजासह काम करेल असे अनेक कॅमेरे, सेन्सर आणि मायक्रोफोन यामध्ये मिळतात. वापरकर्ते व्हिजन प्रोमध्ये कही कामासाठी कीबोर्ड आणि माऊसचा देखील वापर कध शकता. व्हिजन प्रो बायोमेट्रिकसाठी तुमच्या डोळ्यांमधील रेटिना स्कॅन करण्यासाठी ऑप्टिक आयडीचा वापर करते आणि तुम्हाला हेडसेटमध्ये लॉग इन करता येते. हे सर्व 'व्हिजनओएस'सह काम करते.

◆◆◆

कॉर्टिकल इम्प्लांट : दंतरहितेला सार्थ पर्याय

निरोगी शरीरासाठी पोषण आहाराचे जितके महत्त्व आहे तितकेच ग्रहण केलेल्या अन्नाची पाचनप्रक्रियाही सुव्यस्थित असणे आवश्यक आहे. अन्नचा, अपचन, त्यामुळे होणारी ॲसिडिटी यांसह अनेक समस्या जडतात आणि त्याकडे दुर्लक्ष होत राहिल्यास पुढे जाऊन गंभीर व्याधी जडण्याचीही शक्यता असते. अलीकडील काळात आरोग्यविषयीची जागृती वाढल्यामुळे पचनक्रिया योग्य राहावी यासाठी जेवणानंतर चालणे, नियमित व्यायाम करणे, सहज लागेपर्यंत न जेवणे यांसारख्या बाबी अनेक जण करताना दिसतात. परंतु हे सर्व करत असताना एक मुख्य बाब दुर्लक्षित राहते, ती म्हणजे आपण ग्रहण करत असलेल्या अन्न नीट चावले न जाणे. यामध्ये दातांची भूमिका महत्त्वाची असते. किंबहुना, पचनप्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या शरीरातील अवयवांमध्ये दात हे पहिल्या स्थानी असल्याने त्यांची भूमिका सर्वाधिक असते. परंतु दातांच्या आरोग्याबाबत आजही पुरेशी जागरुकता दिसत नाही. परिणामी दंतव्याधींचा सामना करावा लागतो.

खरे पाहता, आरोग्याच्या दृष्टीनेच नव्हे तर सौंदर्य, व्यक्तिमत्व यामध्येही स्वच्छ, निरोगी दात महत्त्वाचे ठरतात. याची जाणीव दात गमावल्यानंतर प्रकर्षाने होते. दात गमावल्यानंतर अन्न चावून खाण्यामध्ये अडचणी येतात. अन्नामध्ये पुरेशा प्रमाणात लाळ मिसळली जात नाही. सुग्रास अन्न अस्रूनही जेवणाचा आस्वाद घेणे दुर्मिळ होऊन बसते. अन्नाचे नीट चर्वण न केले गेल्यामुळे अपचनाच्या समस्या वाढतात. अशीच स्थिती कायम राहिल्यास चेहऱ्यावर कमी वयातच वृद्धत्वाच्या खुणा दिसू लागतात.

वास्तविक आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आता दात गमावल्यानंतरची काळजी दूर करणे शक्य झाले आहे. यामध्ये कवळी बसवणे हा पारंपरिक पर्याय तर आहेच; पण त्याजोडीला दंतप्रत्यारोपणही आता सहजशक्य झाले आहे. कवळी वापरण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेकांना अडचणी येतात. याचे कारण कवळीला हाडांचा पुरेसा आधार नसतो. त्यामुळे टरकण पदार्थ खाता येत नाहीत किंवा खाताना त्रास होतो. तसेच रात्री झोपताना दातांची कवळी काढून ठेवावी लागते. हिरड्यांची झीज झाली असल्यास कवळी नीटप्रकारे न बसल्यामुळे हिरड्यांना सूज येणे, हिरड्यांमधून रक्त येणे असेही प्रकार पाहायला मिळतात.

जाणून घ्या

यावर उपाय म्हणून पारंपरिक दंतप्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करता येते. पण यामध्ये दात बसवण्यासाठी बराच काळ जावा लागतो. त्यामुळे रोज्च्या खाण्याच्या सवयी सुरू होण्यास बराच विलंब होतो. यामध्ये जबडाच्या कमी कडक भागात नवीन दात बसवले जातात. यानंतर रोपण आणि हाड जुळून येण्यासाठी काही दिवस वाट पहावी लागते. यावर उपाय म्हणजे आता नवीन दात बसवण्यासाठी कॉर्टिकल इम्प्लांट नावाचे नवीन तंत्रज्ञान वापरले जाते. हे तंत्रज्ञान प्रामुख्याने ऑर्थोपेडिक संकल्पनेवर काम करते. यामध्ये इम्प्लांट हाडाच्या कठीण भागावर किंवा जबडाचा बसवून त्यावर नवीन दात बसवले जातात. याद्वारे ७२ तासांत नवीन दात त्यांच्या जागी स्थिर होतात. हे तंत्रज्ञान शस्त्रक्रिया विरहित असल्यामुळे यामध्ये रक्तस्राव कमी होतो आणि सूज येण्याची शक्यताही कमी असते.रुग्णांना या प्रक्रियेनंतर लवकरच दैनंदिन जीवनातील खाण्याच्या सवयीप्रमाणे खाणे सुरू करता येते. पायोरियासारख्या दंतविकरांबाबत या तंत्राचा वापर करून प्रभावित दात काढून नवीन दात बसवता येणे शक्य आहे. कॉर्टिकल इम्प्लांटद्वारे जबडाच्या कठीण हाडात दात बसवले जात असल्याने ते पारंपरिक दंतरोपणापेक्षा अधिक काळ टिकतात.

ही आधुनिक पद्धती बऱ्याच अंशी वेदनारहित असल्यामुळे अलीकडील काळात ती चांगलीच लोकप्रिय ठरत आहे. यामध्ये की-होल पद्धतीचा वापर केला जातो. कॉर्टिकल इम्प्लांटस् जबडयाचे हाड रिसॉर्ब झाले असेल तरीही करता येते. अशा प्रकरणांमध्ये पारंपरिक दंतप्रत्यारोपण शक्य होत नाही. त्यामुळे कॉर्टिकल इम्प्लांटस्च्या पर्यायाचा अवलंब करुन दातांशिवाय आयुष्य जगताना येणाऱ्या अडचणींना कायमचा बाय बाय करता येतो. दुधाचे दात जाऊन कायमस्वरुपी म्हणून आलेले दात पडले की पुन्हा येत नाहीत, असे आपण पूर्वापार ऐकत आलो आहोत; पण एकविसाव्या शतकातील नवंतंत्रज्ञानाच्या युगात हा पारंपरिक विचार मागे पडला आहे, असे म्हणावे लागेल.

– डॉ. प्रीतम साळुंखे, दंतविकारतज्ज्ञ

◆◆◆

प्राचीन भाषेचा 'कृत्रिम'अनुवाद

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' किंवा 'एआय'म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने सध्या अनेक थक्क करणारी कामे केली जात आहेत. आता इस्त्रायलमध्ये 'एआय'च्या मदतीने एक असा प्रोग्रॅम विकसित करण्यात आला आहे ज्याच्या साहाय्याने अक्कादियन क्यूनिफॉर्म लेखनाचा अनुवाद करता येऊ शकेल. या प्रोग्रॅमच्या मदतीने पुरातन लेखन प्रणालीस समजणे सोपे होईल तसेच तिचा अनुवादही करता येऊ शकेल.

क्युनिफॉर्म लेखन ही मातीच्या पाट्यांवरील अंकन लिपी आहे. खिळ्याच्या आकाराच्या प्रतिकांचा यामध्ये कोरीव स्वरूपात वापर केला जातो. जगभरातील काहीच तज्ज्ञ या चिन्हांना 'डिकोड'करू शकतात. मात्र, आता ही प्रक्रिया अधिक सोपी होऊ शकते. इस्त्रायलच्या पुरातत्त्व संशोधक आणि कॉम्प्युटर वैज्ञानिकांनी प्राचीन अक्कादियन क्युनिफॉर्मसाठी ऐआय-संचालित ट्रान्सलेशन प्रोग्रॅम विकसित केला आहे. त्याच्या मदतीने एका क्लिकमध्येच लिला इंझजीत अनुवादित करता येऊ शकेल. सोप्या शब्दात सांगायचे म्हणजे 'एआय'च्या सहाय्याने आता पाच हजार वर्षांपूर्वीच्या लेखन प्रणालीसह अनुवादित करता येणे शक्य झाले आहे.

जागतिक स्तरावर अनेक ग्रंथालय, संग्रहालय आणि विद्यापीठांमध्ये क्युनिफॉर्मसह कोरलेल्या मातीच्या पाट्या पाच लाखांहून अधिक आहेत. असा मजकूर भरपूर आहे आणि त्याचे जाणकार कमी आहेत. अक्कादियन क्यूनिफॉर्मही वाचता येणारे मोजकेच लोक आहेत. ही भाषा गेल्या दोन हजार वर्षांमध्ये कुणी बोलली किंवा लिहिलेली नाही. त्यामुळे या टॅबलेटसचा केवळ एक छोटा भाग आतापर्यंत अनुवादित झालेला आहे. आता तेल अवीव विद्यापीठातील संशोधकांच्या प्रयत्नाने ही लिपी उलगडता येऊ शकेल. अक्कादियन ही मेसोपोटामिया आणि मध्य-पूर्वेत इसवी सनपूर्व ३००० ते इसवी सन १०० पर्यंत लिहिली आणि बोलली जात होती. त्यावेळेची ही एक लोकभाषा होती.

◆◆◆

नदीतून शेकडो ब्रास वाळूची अवैध तस्करी सुरू, महसुल व संबंधित पोलीस प्रशासनाची डोळेझाक

उपसावर कारवाई करा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालवर उपोषण

नगर – ढवळपुरी (ता. पारनेर) व नांदगाव शिंगवे (ता. नगर) मार्ग के.के. रेंज या लष्करी भागातील कापरी नदीत काही दिवसांपासून दिवसाकाठी शेकडो ब्रास वाळूची अवैध तस्करी सुरू आहे. वाळू तस्करीकडे महसुल विभाग व संबंधित पोलीस प्रशासनाची डोळेझाक सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरात वाळू तस्करीला चांगलेच उधाण आले असून, कोणालाही न जुमानता ट्रॅक्टर, डंपरद्वारे भरधाव वेगाने मोठ्या प्रमाणात वाळू वाहतुक सुरु असून, सर्वसामान्य नागरिकांना त्रास होत आहे. या पार्श्वभूमीवर वाळू तस्करांपासून होणारा त्रास थांबावा म्हणून आदिवासी भिल्ल समाजातील युवकांच्या वतीने राजू लक्ष्मण पवार यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली आहे.

अवैध वाळू वाहतुकीपासून ढवळपुरी (ता. पारनेर) व नांदगाव शिंगवे (ता. नगर) येथील ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अवैध वाळू उपसाने शासनाना लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना महसूल विभाग व पोलिस यंत्रणा मात्र गप्प असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचा सुर उमटत आहे. डंपर, ट्रॅक्टरच्या नंबर प्लेटा काढून भरधाव वेगाने वाळूहया गाड्या वाहतुक करत आहे.

कापरी नदीमध्ये दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असून, आठ ते दहा जेसीबी मशीनच्या सहाय्याने वाळू उपसा होत आहे. ८० ते ९० डंपर दरराेज हायवे वरुन वाळूची वाहतूक करत आहे. गाड्या जाण्या–येण्याचा मार्ग ढवळपुरी, सुतारवाडी, लालूचा तांडा, जांभूळबन महा असून, ही वाहने के.के. रेंज येथील कापरी नदीत वाळू भरण्यास येतात. याच रस्त्यावर सहा ते सात जिल्हा परिषदच्या शाळा असून, तेथील विद्यार्थ्यांमध्ये भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपरपासून धोका निर्माण झाला आहे. या वाहनांमुळे अनेक लहान–मोठे अपघात होत असून, या भागात मेंढपाळ व धनगर समाज देखील मोठ्या प्रमाणात आहे. कोणी वाहनांना हटकल्यास त्यांना धमकावण्याचे प्रकार सुरु आहे. वाळू तस्करी व ओव्हरलोड वाहतुकीमुळे परिसरातील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. ढवळपुरी गावचा शुक्रवारच्या आठवडे बाजारच्या वेळेसही मोठ्या प्रमाणात वाळूची वाहतुक सुरु आहे. नांदगाव शिंगवे या मार्गे देखील नगर, देहरे, शिंगवे, नांदगाव, सजलपुर, कोळपे आखाडा या भागातून कापरी नदीतून केलेल्या वाळूची वाहतुक सुरु असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

आदिवासी लोकांच्या मुलांना धमकावून व बळजबरीने पाळत तेथण्यासाठी कामावर ठेवले जात आहे. राञभर त्यांना विविध ठिकाणी नेमले गेले असून, शासकीय वाहने त्या रस्त्यावर आल्यास वाळूचे डंपर शेतकऱ्यांच्या शेतात घुसवतात. त्यामुळे शेतातील पिकांची नासाडी होत आहे. हा प्रकार महसूल व पोलीस कर्मचाऱ्यांना माहीत असून, देखील त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. वाळू तस्करी जोमात असताना महसूल विभाग आणि पोलिस यंत्रणा कोमात गेल्याने तस्करांना आळा घालणारा तरी कोण? असा प्रश्न सर्वसामान्य ग्रामस्थ उपस्थित करत आहे.

शासनाच्या महसुलावर दरोडा टाकणाऱ्या व ग्रामस्थांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या वाळू तस्करांना जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांनी आवर घालावा, अशी मागणी आदिवासी भिल्ल समाजातील युवकांच्या वतीने करण्यात आली आहे. संपूर्ण माहिती देऊनही कारवाई हात नाही, उलट गोपनीय माहिती देणाऱ्याचे नाव वाळू माफियांना सांगितले जात असल्याचा आरोप पवार यांनी केला आहे. माहिती दिल्याचा राग मनात धरुन वाळू तस्कर गावातील नागरिक व युवकांना त्रास देत आहे. त्यांची दहशत कायमची संपविण्यासाठी सुरु असलेल्या अवैध वाळू उपसावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालवर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वाळू उपसाचे पुरावे देण्यात आले असून, महसुल प्रशासन काय कारवाई करते याकडे ग्रामस्थांचे लक्ष तक्रारदार राजू पवार यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सदर वाळू उपसाचे व्हिडिओ चित्रीकरण दाखवले असून, याबाबतचे पुरावे देखील दिले आहे. ग्रामस्थ वाळू तस्करांच्या दहशतीने वैतागले असून, त्यांच्यावर कारवाई करुन वाळू उपसा थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

शाळांना अनुदानाचा पुढील टप्पा जाहीर करा

आमदार सत्यजीत तांबेंनी घेतली उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्याची भेट

मुंबई – राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या दरम्यान आमदार सत्यजीत तांबेंनी राज्यातील शाळांच्या अनुदाना संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची भेट घेतली. यावेळी शिक्षणक्षेत्रातील अनेक प्रलंबित प्रश्नांवर आ. सत्यजीत तांबेंनी चर्चा केली. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानाचा पुढील टप्पा द्यावा व त्रुटीपात्र शाळांना पात्र करुन अनुदान घोषित करावे, अशी मागणी आ. सत्यजीत तांबेंनी भेटी दरम्यान केली.

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अनुदानासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलने व मोर्चे करावे लागत आहेत. परंतु अजूनही अनुदानाचा प्रश्न सुटलेला नाही. राज्यातील त्रुटी पूर्तता केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र करावे. तसेच यापूर्वी २०% व ४०% अनुदान टप्पा असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना पुढील २०% टप्पा घोषित करावा. अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना तात्काळ अनुदान मंजूर करणे गरजेचे असून या ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावर खूप मोठा अन्याय झाल्याचे आ. सत्यजीत तांबे यांनी म्हंटले आहे. राज्यातील शाळांना अनुदानाचा पुढील टप्पा देण्याबरोबरच शिक्षण आयुक्त स्तरावरील तपासणी झालेल्या विनाअनुदानित शाळांना तातडीने अनुदान देण्याची मागणी आमदार सत्यजीत तांबेंनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार व शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांच्याकडे केली आहे.

दोन्ही मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली असून याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी अपेक्षा आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केली. यापूर्वी देखील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सत्यजीत तांबेंनी शिक्षणसंस्थांना २०–४०–६० अशा तीन टप्प्यांत अनुदान देणे, थकीत वेतन बिलं देणे, आदी मुद्दे अद्यापही प्रलंबित असून असल्याचे म्हंटले होते. आ. सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात भाषणादरम्यान देखील आ. तांबे शिक्षण विभागातील प्रलंबित प्रश्न मांडले आहेत. यापूर्वी देखील आ. सत्यजीत तांबे हे पावसाळी अधिवेशन, हिवाळी अधिवेशन आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न आ. तांबेनी मांडले होते.

महापालिकेने दिलेला दाखला सुविधा केंद्रात ठरला अवैध

स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध, जोडणीची कार्यवाही रद्द करा

नगर – महापालिकेने दिलेला दाखला जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील सुविधा अवैध ठरविला आहे. मागील दोन दिवसांपासून माजी नगरसेवक जगन हुबे यांच्या सुनबाई शितल जनक हुबे या सुविधा केंद्रात लहान बाळाला घेऊन चकरा मारत आहेत.

शासकीय कामासाठी जे दाखले लागतात त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे देऊनही महापालिकेने दिलेला जन्म दाखला या सुविधा केंद्राने अवैध ठरविला आहे. त्यामुळे आवश्यक कागदपत्रे मिळाली नाहीत. माझे सासरे माजी नगरसेवक जगन हुबे यांनी आजपर्यंत १००० दाखले दिले ते वैध ठरले. मात्र त्यांच्या नातीचा दाखला अवैध ठरविण्यात आला. या बाबींकडे जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी शितल हुबे यांनी केली आहे.

नगर – स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध दर्शवून ही नवीन स्मार्ट मीटर जोडणीची कार्यवाही त्वरीत रद्द करण्याच्या मागणीसाठी समाजवादी पार्टीच्या वतीने शहरातील विद्युत महावितरण कार्यालया समोर गुरुवारी (दि.४ जुलै) निदर्शने करण्यात आली. विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता राजेशकुमार पवार यांना निवेदनाद्वारे सध्याचे मीटर तशाच स्थितीत चालू ठेऊन स्मार्ट प्रीपेडची ग्राहकांना सक्ती करु नये, या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी समाजवादी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन, अजहर पैलवान, अकबर पैलवान, गनी राजमोहम्मद, अल्ताफ लड्डवाला, इझाम तांबटकर, जुबेर शेख, तन्वीर बागवान, जहीर काजी, समीर बिल्डर, मतीन सय्यद, जावेद शेख आदी उपस्थित होते.

स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध, जोडणीची कार्यवाही रद्द करा, या मागणीचे निवेदन विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता राजेशकुमार पवार यांना देताना समाजवादी पार्टीचे पदाधिकारी.

सक्ती केल्यास तीव्र आंदोलन, विद्युत महावितरण कार्यालयासमोर निदर्शने

महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर लावणार असे जाहीर केले आहे. हे मीटर कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी जाहिरात केली जात आहे. संबंधित टेंडर्स मंजूर करण्यात आले आहे. लवकरच सर्वत्र हे मीटर्स लावण्याची मोहीम सुरु होणार आहे. वास्तविक हे मीटर मोफत लावले जाणार नसून, केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटरचा उर्वरित खर्च १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातून वसूल केला जाणार असल्याचा दावा समाजवादीच्या वतीने करण्यात आला आहे.

महावितरण कंपनी खाजगीकरणाच्या वाटचालीतल पुढचा टप्पा म्हणून ही योजना आणलेली आहे. ३०० युनिटचे आत वीज वापर करणाऱ्या सर्वसामान्य छोट्या, घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांना या मीटरचा काही उपयोग नाही व गरजही नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांकडूनही स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणता मीटर वापरायचा आहे? याबाबत मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क व अधिकार संबंधित वीज ग्राहकांना आहेत. कंपनी अघोषित सक्ती करुन ग्राहकांच्या या हक्काचे कायदेशीर उल्लंघन करीत असल्याचे स्पष्ट करुन, स्मार्ट प्रीपेड मीटर बसवण्याची सक्ती न करता सध्याचे सुरु असलेले मीटरच कार्यान्वीत ठेवण्याची मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

खुलेआम शस्त्र घेऊन शहरात दहशत निर्माण करणाऱ्यांवर कारवाई होणार

अहमदनगर शहराबाबत पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित

नगर – अहमदनगर शहरामध्ये १८ जून रोजी रात्री किरकोळ कारणावरून भांडण झाले याामध्ये काही जातीयवादी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी जातीय दंगल भडकवण्याच्या उद्देशाने हस्तक्षेप केले. प्रथम रामवाडी या परिसरात किरकोळ वादावरून वाद झाले त्याचे पडसाद जातीय दंगलीतून जातीयवादी समाजकंटकांनी मशिदीवर, दर्ग्यावर दगडफेक केली तसेच बेकायदेशीरपणे हातात दांडके व हत्यारे घेऊन दुचाकी वाहनावरुन रॅली काढून शहरात जातीय दंगल भडकवणे व दहशत निर्माण करण्याचे काम केले.

अजीम राजे

आ. अबू आझमी

हिंदुगेट येथील शाही मशीदवर दगडफेक तर त्याचवेळी चितळे रोड येथील दर्ग्यावर दगडफेक करण्यात आली. यानंतर सर्वात मोठी घटना पाईपलाईन रोड येथे बेकरीत काम करणारे मुस्लिम समाजाच्या गरीब व कष्टकरी तीन जणांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. यामधील एकाची प्रकृती चिंताजनक असून या सर्व घटनेची सखोलपणे माहिती समाजवादी पार्टीचे आमदार अबू असीम आजमी यांना प्रदेश सेक्रेटरी अजीम राजे यानी दिली.

पावसाळी अधिवेशनात नगर शहराचा तारांकित प्रश्न उपस्थित करण्याचे सांगितले व आज आमदार अबू असीम आजमी यांनी प्रश्न उपस्थित करुन न्याय मिळण्याची मागणी केलेली आहे. समाजकंटकांच्या या कृत्यामुळे शहरातील मुस्लिम समाजामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. समाजकंटकांवर कारवाई होण्यासाठी व शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पावसाळी अधिवेशनात प्रश्न आजमी यांनी मांडला आहे.

विद्यार्थीदशेतच मुलांना कृतीतून वृक्षारोपण महत्त्व पटवावे

अरुण पेशकार यांचे प्रतिपादन

नगर – सध्या बदलत चाललेल्या वातावरणाळुळे निसर्गचक्र बदलले आहे, यासाठी प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे व त्याचे संगोपन केले पाहिजे. प्रत्येकाने राष्ट्रीय कर्तव्य म्हणून ही जबाबदारी घेतली पाहिजे. विद्यार्थी दशेतच मुलांना कृतीतून वृक्षसंवर्धनाची चळवळ आधिक व्यापक होईल. वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळेत लावलेले हे वृक्ष भविष्यात मोठे होऊन चांगले बहरतील, असा विश्वास स्काऊट–गाईडचे जिल्हा संघटक अरुण पेशकर यांनी व्यक्त केला.

नवीपेठ येथील वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा व भारत स्काऊट गाईड अहमदनगर यांच्यावतीने शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा विजयाताई रेखे, सेक्रेटरी सुनिल रुणवाल, अरुण पेशकार, गाईड संघटक सौ.सोनाक्षी तेलंगे, मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरक.

भारत स्काऊट गाईडच्यावतीने वि. ल. कुलकर्णी शाळा परिसरात वृक्षारोपण

नवीपेठ येथील वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा व भारत स्काऊट गाईड अहमदनगर यांच्यावतीने शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा विजयाताई रेखे, सेक्रेटरी सुनिल रुणवाल, स्काऊट गाईडचे जिल्हा संघटक अरुण पेशकार, गाईड संघटक सौ.सोनाक्षी तेलंगे, मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरुन आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सौ.सोनाक्षी तेलंगे यांनी झाडांचे महत्त्व पटवून देतानाच आपण खाल्लेल्या फळांच्या बिया साठवून त्याची रोपे तयार करुन ती झाडे वाढविण्याचा दृढनिश्चिय केला पाहिजे, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

यावेळी श्रीमती विजयाताई रेखे यांनी शाळेच्या माध्यमातून शाळेच शिक्षणबरोबर विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षण देऊन त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन दिले जाते. वृक्षारोपणाचे महत्त्व सर्वांनी जाणून त्याप्रमाणे कृती केली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून दिला असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरम यांनी शाळेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती वृक्षारोपण उपक्रमाबद्दल आभार मानले. यावेळी सर्व कब मास्टर, फ्लॉकलिडर्स, स्काऊट मास्टर, गाईड कॅप्टन, स्काऊट गाईड पथकातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्ह्यात १२ जुलैपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

नगर – जिल्ह्यात सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी त्यांना प्राप्त अधिकारानुसार संपूर्ण अहमदनगर जिल्हा महसूल स्थळ सीमेच्या हद्दीत महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये जिल्ह्यात १२ जुलै, २०२४ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार समूह केलेल्या कालाबधीत व ठिकाणी कोणत्याही इसमास पुढीलप्रमाणे कृत्ये करण्यास मनाई करण्यात आली आहे. शस्त्रे, मोटे, तलवारी, भाले, दंडुके, बंदूका, सुरे, काठ्या किंवा लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जवळ बाळगणे, जमा करणे. जाहीरपणे घोषणा देणे, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, ध्वनीवर्धक किंवा ध्वनीक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणारा किंवा तो जसाच्या तसा ऐकवणारे उपकरण संच वापरणे किंवा वाजवणे, सभ्यता अगर नीतिमत्ता यास धक्का पोचेल किंवा शांतता धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य करणे, आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे किंवा सॉंग आणने अगर तशी चित्रे, चिन्हे किंवा इतर वस्तू तयार करणे किंवा त्यांचा प्रचार करणे. सार्वजनिक तसेच खाजगी ठिकाणी निवडणूक प्रचारार्थ तसेच अन्य कारणास्तव सभा घेण्यास, मिरवणूका काढण्यास व पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई केली आहे.

शासकीय सेवेतील व्यक्तींना ज्यांना आपले वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यार जवळ बाळगणे आवश्यक आहे, तसेच ज्या व्यक्तींना शारिरीक दुर्बलतेच्या कारणास्तव लाठी अगर काठी वापरणे आवश्यक आहे. तसेच प्रेतयात्रा, धार्मिक कार्यक्रम, धार्मिक मिरवणूका, लग्न समारंभ, लग्नाच्या मिरवणूका हे कार्यक्रम, सभा घेण्यास अथवा मिरवणूका काढण्यास ज्यांनी संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची रितसर परवानगी घेतली आहे, अशा व्यक्तींना हा आदेश लागु राहणार नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

तिसगाव येथील श्री वृद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमित विद्यालयातील शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेले ५ विद्यार्थी. समवेत शिक्षक किरण दानवे, सुवर्णा अकोलकर आदी.

वृध्देश्वर हायस्कूलचे पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत चमकले

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये विद्यालयातील पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत २० विद्यार्थी पात्र झाले असुन कु.सोनवणे आराध्या सुभाष (२४२ गुण), चि.साठे सोहम प्रविण (२२८ गुण) व कु.शिंदे ओवी आशिष (२२४ गुण) हे तीन विद्यार्थी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत कु.डहाळे अनुष्का वैभव(१९० गुण) व कु.दमाळ मनस्वी नितीन(१८० गुण) या दोन विद्यार्थीनींनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र गोसावी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक किरण दानवे, सुवर्णा अकोलकर, प्रेरणा कदम, प्रशांत शिंदे, प्रविण साठे, राजेंद्र हंडाळ, सीमा ठाकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड.विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी जयंत वाघ, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ.बाळकृष्ण मरकड, संस्थेचे सदस्य चंद्रकांत म्हस्के, अरविंद आठरे, काशिनाथ पा. लवांडे, सरपंच मुनिफा शेख, विद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र गोसावी, पर्यवेक्षक केशव जाधव, दादासाहेब मरकड यांनी अभिनंदन केले.

मनपा आयुक्त पंकज जावळे यांना अटकपूर्व जामीन देण्यास नकार

नगर – लाच मागितल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना अंतरीम अटकपूर्व जामीन देण्यास न्यायलयाने नकार दिला आहे. अटकपूर्व जामिनावर म्हणणे सादर करण्यासाठी सरकार पक्षाला मुदत देण्यात आली असून, या अर्जावर आता ८ जुलैला सुनावणी होणार आहे.

एका बांधकाम व्यावसायिकाला आठ लाखांची लाच मागितल्याप्रकरणी आयुक्त जावळे व स्वीय सहाय्यक श्रीधर देशपांडे या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होण्याआधीच दोघेही पसार झाले होते. अलिप्त गुगळे यांच्यामार्फत जिल्हा न्यायालयात बुधवारी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला. त्यावर काल सकाळी सुनावणी झाली. फिर्यादीच्या २५, २६ व २७ जून असे तीन दिवस ट्रॅप लावल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात बांधकाम परवानगीचे प्रकरण २० जूनला दुपारी २.३२ वाजता आयुक्तांकडून मंजूर करण्यात आले आहे. त्यांच्या शासकीय निवासस्थानी व कार्यालयात छापे टाकण्यात आले. तेथेही काहीही सापडले नाही. त्यांना अटक करून तपास करण्याची गरज नाही. अटक केल्यास त्यांचे करिअर उद्ध्वस्त होईल, निलंबन होईल. तसेच, अशाच वेळा प्रकरणांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केलेल अस्ल्याकडे लक्ष वेधत आयुक्त जावळे यांना अटकपूर्व जामीन मंजूर करावा, असा युक्तिवाद ॲड. गुगळे यांनी केला.

फिर्यादीच्यावतीने ॲड. अभिजीत पुप्पाल यांनी अटकपूर्व जामीन अर्जाला विरोध करत, मार्च महिन्यापासून परवानगी रखडवण्यात आल्याकडे लक्ष वेधले. या वर्तनातून आयुक्तांचा लाचेचा उद्देश दिसून येतो. किती युनिट आहेत, प्रति युनिट किती दर व त्याचे किती होतात, यावर चर्चा होऊन बार्गेनिंग झाले आहे. त्याचे इलेक्ट्रॉनिक पुरावे आहेत, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला त्यांनी दिला. मात्र, ॲड. गुगळे यांनी ६ जून रोजी आयुक्तांकडे प्रकरण आल्याची नोंद आहे, युनिट, दर आदींची जी चर्चा फिर्यादीत आहे, त्यात आयुक्त जावळेशी चर्चा नाही, सर्वोच्च न्यायालयाचा जो निकाल दाखवला गेला, तो लाच घेतल्याच्या प्रकरणातील आहे, असे स्पष्ट करत ॲड. पुप्पाल यांचे दावे खोडून काढले.

सरकार पक्षाकडून ॲड. अनिल घोडके यांनी जालना येथील पथकाने कारवाई केली असून, त्यांच्याकडून म्हणणे मांडण्यासाठी मुदत मिळावी, अशी मागणी केली. त्यावर ॲड. गुगळे यांनी अटकपूर्व जामिनावर निर्णय होईपर्यंत अंतरिम जामीन द्यावा, अशी मागणी न्यायालयात केली. त्यावर न्यायालयाने सायंकाळी निकाल देत अंतरिम जामीन देण्यास नकार दिला व पुढील सुनावणी सोमवारी ठेवली आहे. सोमवारी सरकार पक्षाकडून म्हणणे सादर करण्यात येणार आहे.

पाहिजे
दुकानात काम करण्यासाठी अकौंटंट पाहिजे. त्वरित संपर्क करा.
Mo : 9975454505

एजन्सी कामासाठी खालील जागा भरणे आहे
* सेल्समन : ०१ (अनुभवी असावा)
* टाटा गोल्डवर ड्रायव्हर : ०१ (एजन्सी कामाचा अनुभव असावा)
* हेल्पर बॅकअप कामासाठी : ०१

स्नेहा एन्टरप्राईजेस नगर-पुणे रोड, केडगाव 9028049555

पाहिजेत
बिलींग ऑपरेटर (पुरुष)
डिलीव्हरी बॉय
हॉटेल विजय
स्टेशन रोड, अ.नगर.

बॅकेच्या टेली कॉलिंगला मुले आणि मुली पाहिजेत
– २० जागा
आदिश एन्झाम ऑफिस,२०६, दुसरा मजला, डौले हॉस्पिटल शेजारी, सावेडी, अ.नगर.
8830408150

रो-हाऊस बंगलो विकणे
अ.नगर, तपोवन रोड, सूर्यनगर येथील 2BHK रो-हाऊस बंगलो (820 स्क्वे.) फूट विकणे आहे.
7083562849
7058562849

2000 स्क्वे. फूट कमर्शियल प्रॉपर्टी भाड्याने देणे आहे.
(स्वतंत्र बाथरूम व पाण्याची सोय.)
व्हीआरएल ट्रान्सपोर्टजवळ एल अँण्ड टी कंपनीशेजारी, एमआयडीसी, अ.नगर
8329486064

1 BHK फ्लॅट विकणे
सर्व सोयींनीयुक्त नवनाथनगर, बोल्हेगाव येथे
9527360303

2 BHK नवीन रो-हाऊस विकणे/ भाड्याने देणे आहे.
147/2 B, आनंद पार्क, सोलापूररोड, जकात नाक्याजवळ सर्व सुविधायुक्त.
8999464755
9657756714

गाळे,ऑफिस भाड्याने देणे
मार्केटयार्ड,अहमदनगर येथे शिवाजी महाराज पुतळ्याजवळ
9422220438

भाड्याने देणे
१ ला व २ रा मजला भाड्याने देणे आहे. १३००+१३०० स्क्वे.फूट मार्केटयार्ड, मर्चंट बँकेच्या शेजारी, अहमदनगर
: संपर्क :
9822058951 (हॉस्पिटलसाठी प्राधान्य)

भाड्याने देणे आहे
२५० स्क्वे.फूट बेसमेंट गाळा : गुलमोहररोड
दोन रूमचे घर भुतकरवाडी : सावेडी,अ.नगर
संपर्क : 9511706053

व्यवसाय करण्यासाठी उत्तम ठिकाणी जागा शोधत आहात!
जागा भाड्याने देणे आहे
तळमजला
2000 Sq.ft.
अधिक माहितीसाठी संपर्क : 92848 24268, 77967 78068

भाड्याने देणे आहे
सावेडीमधील प्राईम लोकेशनमध्ये ८५०० स्क्वे.फूट, १२००० स्क्वे.फूट चार मजली नवीन बिल्डींग, लिफ्टसह प्रशस्त पार्किंग, भाड्याने देणे आहे. शोरूम, बँक, कॉर्पोरेट ऑफिसेस, क्लासेससाठी उपयुक्त
7796099890, 9119922177

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज
9% व्याजदर
शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹ 58000
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
अधिक माहितीसाठी संपर्क :
7888219471, 94231 67850
बागडपट्टी, अहमदनगर

बाई पाहिजे
१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे (वयोमर्यादा १८ ते ४०)
– संपर्क –
8888576576

वर पाहिजे
वधु-२६, ५.३ बी.ए. हिंदु-ब्राह्मण समाज, प्रायव्हेट जॉब, बाबा नाही. १ भाऊ विवाहित, मुलीसाठी ब्राह्मण, जैन, मराठा, भंडारी व इतर हिंदू समाजातील वर चालेल.
– संपर्क –
7517057842
8421168826

भाड्याने देणे
मार्केटयार्डमध्ये भुईकाटाजवळ ग्राऊंड फ्लोअर ७५० स्क्वे.फूट व पहिला मजला २४०० स्क्वे.फूट भाड्याने देणे आहे.
9422171702, 7743997743

जगतात हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर
सोनोग्राफी 500/- | नॉर्मल डिलिव्हरी 9000/- | सिझर डिलिव्हरी 19000/-
प्रसुतीगृह । स्त्री रोग । वंध्यत्व निवारण । लॅप्रोस्कोपी । शासनमान्य गर्भपात केंद्र
जगतात हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रॉडव्यसच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

बजाज वॉटरप्युफिंग कं.
जर्मन टेक्नॉलॉजी
तोडफोड न करता ५ वर्षांच्या लेखी गॅरंटीसह केमिकल वॉटरप्युफिंग स्लॅब, बाल्कनी, वाशरूम, पाण्याची टाकी इ.
9096291653

सरकारमान्य संस्था घरबसल्या रोज ५०० ते १००० रु. कमवा
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा. माल फ्री घरपोहोच
धनश्री उद्योग
अंबर प्लाझा बेसमेंट, नगर मैदानाच्या खाली, साईबाबा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

संतुजी कृषी फार्मचे प्रसिद्ध निसर्ग जांभूळ
निसर्ग जांभूळ
आपल्या नगर शहरात
संपूर्णपणे नैसर्गिक पध्दतीने जोपासलेल्या बागेतील
जांभूळफळे
- 1 किलो च्या पॅक मध्ये - 300/- रु किलो
- घरपोहोच सेवा उपलब्ध
* आमची प्रसिध्द उत्पादने *
जांभूळ सीड पावडर व जांभूळ वाईन
घरपोहोच मागविण्यासाठी आत्ताच संपर्क करा
मो. नं. 8262876581
वेबसाईट : www.nisargjambhul.com

गुरु DRY FRUITS
MONSOON OFFER
मान्सून च्या बरसल्या सरी .. गुरु सुपरमार्केट च्या ऑफर्स भारी !!

बदाम कॅलिफोर्निया 250G ₹205/- ₹190/-	गोवा काजू 250G ₹250/- ₹215/-	प्रि.किशमिश 250G ₹100/- ₹85/-	अक्रोड मगज 250G ₹440/- ₹275/-
रोस्टेड पिस्ता 250G ₹330/- ₹300/-	काळा मनुका 250G ₹170/- ₹125/-	मेडजोल खजूर 500G ₹1000/- ₹699/-	स्पे.पिवळी खारीक 500G ₹185/- ₹155/-
बेबी अंजीर 400G ₹220/- ₹180/-	तुर्कील जर्दालू 200G ₹350/- ₹290/-	रोस्टेड काजू - बदाम अखरोट - पम्पकिन सीड जवस - मकाना	

गुरु सुपरमार्केट Since 2013 माऊली संकुलसमोर
झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर
फोन :०२४१-२४१०५७५
सोमवार बंद!

COMING SOON
The Club Resort
Lawns | Ac banquet | luxuries Room
Unique Restaurant | And Many More
Address : Savedi, Near Hotel Nagri Village, Jadhav Nagar, A.nagar
BOOKINGS STARTED Contact : Mo. 9270570699

२१ जुलै २०२४
अयोध्या दर्शन यात्रा
काशी विश्वेश्वर, प्रयागराज, त्रेता त्रिवेणी क्षेत्र
प्रवास : १० दिवस
उज्जैन, अयोध्या, प्रयागराज, रवा, वाराणसी, किष्कुट, सती अनुसया, गुप्त गोदावरी, ओंकारेश्वर, शेगाव
प्रतिव्यक्ती ₹ 11601/-
2 x 2 आरामदायी स्लीपर कोच बसने प्रवास, निवास व भोजनासह
श्री सुविधा यात्रा कंपनी संचलित
AMAR PREM Holidays & Multiple services
० ईशा अग्रिम ०
श्री. संजय रामराव गुगळे
श्री. सविता संजिव गुगळे
मो. ९३२६५९९०० / ९८६०४०५०५०
गुलाब सोसायटी, पिंपळगाव, ता.आष्टी, जि.बीड
० पुणे अग्रिम ०
श्री. संजय महेश कासवा
श्री. सविता संजय कासवा
मो. ९३२६५९९०० / ९८९०१०१०१०
कासवा सोसायटी, पिंपळगाव, ता.आष्टी, जि.बीड
० नाशिक अग्रिम ०
श्री. प्रवीण रमेश
मो. ९८९०१०१०१ / ९२२०२०२०२०
सर्व ए. सी. बस टि.व. आरामदायक सोयीसह, पाणी, पॉलिथीन, पॉलिश, उशाला

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीचे समग्र लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या जमिनीचे विमान मालक श्री. मानसी बाबु जाधे,स.न. बुरुडगाव रोड, ता. जि. अहमदनगर. २. सुरेश बाबु जाधे रा. जाधव मळा, हिकमत रोड, बंदनगर हॉटेल जवळ, अहमदनगर. ३. अरुण मारुती पारगे रा. गोपाळवाडी, ता. जि. अहमदनगर ४. प्रताप्सिंग ठेरे रा. पोखर्डी, ता. जि. अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आपले अशिलांकडेचा कायमचुक खरेदी देण्याचे हस्तुत आमच्या अशिलाकडुन रक्कम स्वीकारली आहे. तरीच सदर जमीन विक्रय ही निर्विघ्न निर्जोखमी व बोजाराहित, असल्याची विक्रार व भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे.
या उपरही सदर जमीन विक्रयाची बाबत कोणत्येही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, सावा, भगडा, विभा, महाल, हक्कीचा, वारसा, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास स्त्रांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १४ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रांची पुरव्यानिशी लेखी कळवावे, उर्वर मुदतीत कोणतही कोणतेही हरकत न आल्यास अथवा अशिल सदर जमीन विक्रयाचीच खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणत्येही कोणत्याही प्रकारे अन्य हरकत घालणार नाही, असल्यास स्त्रांनी जाणीपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.
यानी नोंद घ्यावी. दि. ०५/०७/२०२४.
परिशिष्ट
विक्रयाचे वर्णन - जिल्हा अहमदनगर पेठ तुकडी व तालुका नगर येथील जिल्हापरिषद हद्दीतील मौजे सावेडीसाठी विक्रयाचे वर्णन खालील प्रमाणे –
गट नंबर १२३/४ पे क्षेत्र १.३५ एफ आर + पोट खराब० हे. १८ आर असे एकुण १.३५ एफ वाचा आकार १ रु. १२ पैसे.
चारदिशी
अ) विक्रयाच मालक श्रेय मारुत अक्षयराजधी, रा. श्रीनगर रोड, अहमदनगर यांचा मालकीची जमीनमाली व. १० आर शेरजमीन विक्रयाच, सदर नदाचा एफ बीआर अनुक्त ते व त्याचे पाणी झंपुला हिस्याप्रमाणी.
यांची चद्दुदिशा :
पुर्वेस – गट नं. ५२९/२ पैकी दक्षिणेस – गट नं. ५२९/४ पैकी शेष सरकारच शीकत
पश्चिम – बांधीती रस्ता. उत्तरेस – गट नं. ५२९/४ पैकी
ब) विक्रयाच मालक श्रेय सरकारचा प्रतिनिधी, म. ग्रेडीनेट, अहमदनगर यांचा मालकीची मालमाचाची व. ३० आर शेरजमीन विक्रयाच, सदर नदाचा एफ बीआर अनुक्त ते व त्याचे पाणी झंपुला हिस्याप्रमाणी.
यांची चद्दुदिशा :
पुर्वेस – गट नं. ५२९/२ पैकी, दक्षिणेस – गट नं. ५२९/४ पैकी
पश्चिम – बांधीती रस्ता, उत्तरेस – गट नं. ५२९/४ पैकी मनुवर शेख
वेळेप्रमाणे भाडुविरुध्दच काही एक राखुन न ठेविता.
दि. ०५/०७/२०२४
अहमदनगर.
अॅड. तन्वीर एम. शेख
गोटी पॉक्षिस (पगार सल्लार)
अॅड. मोहसीन जावद. शेख
वसुली पक्षिस (वाहन सल्लार)
अॅड. नाविन अहमद उस्मानीन शेख
जुना कालेनर ऑफीस जवळ, झावेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४२१८१० / ७२७६२५२७४८

Green Library
EARTH'S Greenery for Every Space
Get a Plant Today!
• Potted Planters
• Premium Planters
• Garden Accessories
• Garden Furniture
• Garden Lightings
Fresh Environment with Indoor Plants
Amit Sankleche 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीचे समग्र लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीनीचे विमान मालक १. अमित बाबु जाधे,स.न. बुरुडगाव रोड, ता. जि. अहमदनगर. २. सुरेश बाबु जाधे रा. जाधव मळा, हिकमत रोड, बंदनगर हॉटेल जवळ, अहमदनगर. ३. अरुण मारुती पारगे रा. गोपाळवाडी, ता. जि. अहमदनगर ४. प्रताप्सिंग ठेरे रा. पोखर्डी, ता. जि. अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आपले अशिलांकडेचा कायमचुक खरेदी देण्याचे हस्तुत आमच्या अशिलाकडुन रक्कम स्वीकारली आहे. तरीच सदर जमीन विक्रयाचा ही निर्विघ्न निर्जोखमी व बोजाराहित, असल्याची विक्रार व भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे.
या उपरही सदर जमीन विक्रयाची बाबत कोणत्येही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, सावा, भगडा,विभा, महाल, हक्कीचा, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास स्त्रांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १४ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रांची पुरव्यानिशी लेखी कळवावे, उर्वर मुदतीत कोणतही कोणतेही हरकत न आल्यास अथवा अशिल सदर जमीन विक्रयाचीच खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणत्येही कोणत्याही प्रकारे अन्य हरकत घालणार नाही, असल्यास स्त्रांनी जाणीपुर्वकच सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.
यानी नोंद घ्यावी. दि. ०५/०७/२०२४
परिशिष्ट
विक्रयाचे वर्णन - हि. अहमदनगर सब. हि. ता. अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे बुरुडगाव येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

ह.नं.	आ.आर.	रु.पै.
५०/१/१	३ – ८१	४ – ६४
	पोच ० – ३०	
	४ – ०१	

यानंतरी विक्रयाच मालक यांच्या मालकीची संपूर्ण ० हे ०५ आर + पोच ० हे ०७ आर असे एकुण ० हे १२ आर जमिनीमाचा.
यांची चद्दुदिशा :
पुर्वेस – लगुन सर्वे नं. ४५ स्कीम अहमद शेख व इतर यांची मिळकत
दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – गट नंबर पैकी विमल सुधाकर यादव व इतर यांची मिळकत
उत्तरेस – गट नंबर पैकी बबन पिसाळे पाचारने व इतर यांची मिळकत
वेळेप्रमाणे भाडुविरुध्दच काही एक राखुन न ठेविता.
दि. ०५/०७/२०२४
अहमदनगर.
अॅड. नाविन अहमद उस्मानीन शेख
अॅड. कुरेशी पेन्शन फारुक
जुना कालेनर ऑफीस जवळ, झावेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४२१८१० / ७२७६२५२७४८

REVOLUTION in animation world
graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM
COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net Duration : 6 Months
CERTIFICATE COURSE IN SOFTWARE PROGRAMMING
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthun Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414001
7447761769

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257557718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
दरशेज
■ नगर येवुन स. ७,८,९ व दुपारी २.००
■ पुणे येथुन स.१२,३,४,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -पिंपळवा कॉफ, झोपडी कॅन्टीन, लाखुर, हिंदोरि, रात पेंशा बॉक,कारंजीक बॉक,केशव
पुणे झोन- बावोंसी, खराडी बायपास,रेवडा, नवीन विश्रांतीनगर सारोदेव
एकिन आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
अकोल- शिवाजीरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

टिप : मुलुं-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 05 ते 12 जुलै 2024
कल्की
(3D) 8.30 AM, 2.00 PM, 7.30 PM, 11.00 PM
(2D) 7.30 AM, 11.00 AM, 5.45 PM, 9.15 PM
किल 9.00 AM, 11.15 AM, 3.45 PM 8.30 PM, 10.40 PM
डेस्पीकेबल (3D) Hindi 12.00 PM, 5.30 PM
मुंजा 6.00 PM
आम्ही जरांगे (मराठी) 2.30 PM
विषय हार्ड (मराठी) 1.30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील..
जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील..

दशक्रिया विधी
कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, आमची आई स्व.गं.भा.सुशिलाबाई रंगनाथराव आगरकर यांचे गुरुवार दि.२७/०६/२०२४ रोजी सायं. ८ वा. अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली.
दशक्रिया विधी : शनिवार, दि.०६/०७/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता अमरधाम,नालेगाव, अहमदनगर येथे होणार आहे.

स्व.गं.भा.सुशिलाबाई रंगनाथराव आगरकर
(जन्म : ०१/०६/१९४० । स्व-२७/६/२०२४)

आप्तस्वा पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दुःखांकित :
दिलीप रंगनाथराव आगरकर
मुकुंद रंगनाथराव आगरकर
सुनिल रंगनाथराव आगरकर
अनिल रंगनाथराव आगरकर
सौ.शीला मधुकरराव राऊत (मुलगी)
समस्त आगरकर परिवार
9766087186 & 9503030443